दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

www.lakshamaharashtra.com  lakshamaha.dhule@gmail.com  lakshamaha.nsk@gmail.com  RNI No.MAHMAR/2019/79184

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ९० वा ▶ रविवार दि.४ फेब्रुवारी २०२४ ▶ किंमत :२ रु. ▶ पृष्ठे : ६

खुशखबर... खुशखबर...

खास लोकांच्या आग्रहास्तव

न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स्, धुळे

पार्सल सेवा व रिटर्न बुकींग उपलब्ध

धुळे ते नागपुर, अमरावती, अकोला

स्लिपर कोच २X१ नॉन एसी बस

रात्री १०.३० वाजेला



संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896

दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

# धुळ्यातील कलावंतांमध्ये मोठे होण्याची प्रचंड क्षमता : डॉ. अनिल बांदिवडेकर

## धुळ्यातील एकांकिकांनी जिंकली परिक्षकांची मने

**धुळे । पुरुषोत्तम पाटील**

धुळे शहरात अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने आयोजित शंभरावे नाट्य संमेलनाच्या निमित्ताने महाराष्ट्रभर नाट्यकलेचा जागर सुरु आहे. त्या अंतर्गत पत्रकार भवनात शनिवारी एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

सकाळी स्पर्धेचे उदघाटन जेष्ठ कलावंत दिलीप दळवी, जेष्ठ कलावंत डॉ. अनिल बांदिवडेकर, जेष्ठ कलावंत विलास पगार, धुळे शाखेचे अध्यक्ष सुनिल नेरकर, मुंबई नियामक मंडळ सदस्य चंद्रशेखर पाटील, धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष रवींद्र इंगळे, धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सचिव सचिन बागुल, सुजय भालेराव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ७ एकांकिकांना सादर करण्यात आले. तरूणाईने जोरदार प्रतिसाद दिला. परीक्षक जेष्ठ कलावंत डॉ. अनिल बांदिवडेकर यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले कि, प्रशांत दामले यांच्या संकल्पनेतून कला हि गावागावात जोपासली जावी म्हणून स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. जी एकांकिका परीक्षकांना थकवते ती प्रेक्षकांना आवडते ती पुढच्या फेरीत जाते. तुम्ही सर्व कलाकार एक दिलाने काम करा असे देखील सांगितले.

परीक्षक जेष्ठ कलावंत दिलीप दळवी यांनी सांगितले कि धुळ्यात एवढी चांगली स्पर्धा होईल हे वाटले नव्हते. तसेच धुळ्यात आता चंद्रशेखर पाटील यांनी काम केले आहे असे देखील वाटत आहे. धुळ्यातील एवढा मोठा माणूस मुंबईत आहे. असे म्हणत चंद्रशेखर पाटील यांचे कौतुक देखील केले. अभिनय बरोबर जे स्टेज मागे काम करतात ते देखील खुप मोठे असतात. मी देखील एकांकिका स्पर्धांमधून मोठा झालो आहे. धुळेकरांनी या स्पर्धांना एवढा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला त्याबद्दल त्यांनी धुळेकरांचे आभार देखील व्यक्त केले. मुंबई नियामक मंडळ सदस्य चंद्रशेखर पाटील यांनी सांगितले कि, आज खऱ्या अर्थाने नाट्य परिषदेचा उद्देश पूर्ण झाला. अजुन मोठ्या प्रमाणात धुळ्यात कलाकार तयार झाला पाहिजे असा देखील नाट्य परिषदेचा प्रयत्न आहे. धुळे शाखेचे अध्यक्ष सुनिल नेरकर यांनी सांगितले कि,आमच्या मुलांना चांगले व्यसपीठ मिळाले तर आमचे मुंल देखील तुम्हाला मुंबईत दिसतील. तसेच लवकरच धुळ्यातील कळकरांसाठी कार्यशाळेचे आयोजन करू असे देखील त्यांनी सांगितले. गुणवत्ता प्रमाण पत्र परीक्षक जेष्ठ कलावंत विलास पगार यांनी जाहीर केले. तसेच कलाकारांचे कौतुक देखील केले.





### उत्सुकता निकालाची

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने धुळ्यात एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सादर झालेल्या दर्जेदार एकांकिकांमुळे स्पर्धकांसह प्रेक्षकांना निकालाची उत्सुकता लागली आहे. आज निकाल जाहीर करण्यात येईल असे देखील सांगितले. त्यामुळे कलाकारांसह धुळेकर नागरिकांना निकालाची उत्सुकता लागली आहे.

### गुणवत्ता प्रमाणपत्र जाहीर

यामध्ये स्वराज सावेत, राहुल मंगळे, मिहिरे पाटील, ओम कासार, कुणाल खैरनार,सिद्धार्थ मंगळे, धनश्री कारभारी, जोती मंगळे,हर्षदा शिरसाठ धृवाक्षी क्षीरसागर, प्रमोदिनी पाटील, राधिका नेरकर यांना जाहीर झाले.













# मंत्रालयात बैठक घेवून विनोद वाईन्सचा निकाल लावणार : आ.फारुख शाह

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

धुळे शहरातील मध्यवर्ती भागातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या मागे असलेले विनोद वाईन्स हे विदेशी मद्याचे दुकान बंद करण्यात यावे यासाठी आझाद समाज पार्टीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.आ.फारुख शाह यांनी उपोषणकर्ते आनंद लोंढे,भैय्यासाहेब वाघ आणि कार्यकर्त्यांची भेट घेतली व येत्या आठवड्यात मंत्रालयात राज्य उत्पादन शुल्क मंत्री ना.शंभुराज देसाई यांच्या दालनात उच्चस्तरीय बैठक घेवून विनोद वाईन्सचा कायम स्वरुपी निकाल लावणार असल्याचे प्रतिपादन आ.फारुख शाह यांनी केले.

आझाद समाज पार्टीच्या वतीने गेल्या दोन महिन्यांपासून धुळे शहरातील मध्यवर्ती भागातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या मागे असलेले विनोद वाईन्स हे विदेशी मद्याचे दुकान हटवावे यासाठी आंदोलन करण्यात येत आहे. दि.१ फेब्रुवारी पासून आनंद लोंढे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येत आहे. आज रोजी उपोषणस्थळी आ.फारुख शाह यांनी भेट देवून उपोषणकर्त्या कार्यकर्त्यांना पाठिंबा दिला.यावेळी राज चव्हाण,सतिष अमृतसागर,हारूण खाटीक,आसिफ शाह आदी उपस्थित होते.



# वाहतूक नियमांचे पालन करत चालकांनी व्यसनापासून दूर रहावे : राकेश हांडे

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



रस्ते अपघात टाळण्यासाठी चालकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे. विशेषत: व्यसनापासून पूर्णपणे दूर रहावे असे आवाहन आडगाव वाहतूक विभागाचे पोलीस निरिक्षक राकेश हांडे यांनी चालकांना केले आहे. नाशिक जिल्हा ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रक टर्मिनल, आडगाव येथे राष्ट्रीय रस्ता सुरक्षा वाहतूक अभियान २०२४ अंतर्गत वाहतूक सुरक्षा शिबिर व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

नाशिक शहर वाहतूक पोलीस व परिवहन विभाग नाशिक यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमास आरटीओ प्रविण सोनवणे, वाहतूक नियमांचे शाळा कॉलेजमध्ये धडे देणारे पोलीस सचिन जाधव, नाशिक ट्रान्सपोर्टचे अध्यक्ष राजेंद्र फड, कार्याध्यक्ष पी.एम.सैनी, माजी अध्यक्ष जयपाल शर्मा आदी उपस्थित होते.

# मंत्री छगन भुजबळ यांच्या उपस्थितीत अहमदनगरमध्ये उसळला ओबीसींचा जनसागर

## खोटे दाखले दिले तर ओबीसी आरक्षण संपुष्टात येईल : मंत्री छगन भुजबळ

**अहमदनगर । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

आपल्याला आमदारकी, मंत्री पदाची कुठलीही फिकीर नसून ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी आपण शेवटपर्यंत लढणार आहोत. त्यामुळे कुठल्याही दबावाला बळी न पडता संपूर्ण ओबीसी समाजाने एकत्र येऊन लढलं पाहिजे असे आवाहन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

ओबीसी भटके विमुक्त आरक्षण बचाव एल्गार मेळावा काल अहमदनगर येथे पार पडला. यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री आ.महादेव जानकर, आमदार गोपीचंद पडळकर, माजी आमदार प्रकाश शेंडगे, मुस्लिम ओबीसी संघटनेचे शब्बीर अन्सारी, प्रा.लक्ष्मण हाके, सत्संग मुंडे, प्रा.पी. टी. चव्हाण, पांडुरंग अभंग, कल्याण दळे, शंकरराव लिंगे, दौलतराव शितोळे, डॉ.सुदर्शन घेरडे, डॉ.स्नेहा सोनकाटे, जे.डी.तांडेल, आंधळे महाराज, मिननाथ पांडे, अरुण खरमाटे, अभय आगरकर, अनिल निकम, डॉ. नागेश गवळी, विशाल वालकर, भगवान फुलसुंदर, अंबादास गारुडकर यांच्यासह ओबीसी भटके विमुक्त समाजातील बांधव बहुसंख्येने उपस्थित होते.



# तोतया जीएसटी अधिकारी टोळीतील बबल्याला अटक

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

बेडरपणे लाल दिव्याचे वाहन उपयोगात आणून मुंबई-आग्रा महामार्गावर तोतया जीएसटी अधिकारी बनून पैसे लुटणाऱ्या टोळीतील चौथा संशयित विनय सुरेश बागूल उर्फ बबल्या (रा. पिंजारी चाळ, रेल्वे स्टेशन भाग, धुळे) यास पोलिसांनी शुक्रवारी अटक केली.

पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी या गंभीर प्रकरणाचा तपास पारदर्शकतेने होण्यासाठी पोलिस उपअधीक्षक हृषिकेश रेड्डी यांच्याकडे सोपविला आहे. पोलिस अधीक्षक धिवरे यांनी सुरवातीपासून या गंभीर घटनेचा पारदर्शकतेने तपास करून उलगडा करण्याचे ठाणले. त्यास यश मिळाले.तत्कालीन एका बड्या पोलिस अधिकाऱ्याच्या आशीर्वादाने तोतया जीएसटी अधिकारी बनवून पैशांची लूट करणाऱ्या टोळीने ७१ लाख रुपयांची लूट केल्याचे आतापर्यंतच्या तपासात निष्पन्न झाले आहे. पोलिस कर्मचारी बिपिन आनंदा पाटील (रा. धुळे) व त्याची बहीण स्वाती रोशन पाटील (रा. नाशिक), पोलिस कर्मचारी इम्रान ईसाक शेख (रा. धुळे) याला बुधवारी रात्री अटक करण्यात आली. यानंतर संशयित बबल्या बागूल यास अटक करण्यात आली आहे. ज्या व्यापाऱ्यांची अशा प्रकारे फसवणूक झाली असेल त्यांनी आझादनगर पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन श्री. धिवरे यांनी केले. पटीयाला (पंजाब) येथील व्यापारी कश्मीरसिंग सरदार हजारासिंग बाजवा (वय ५९) यांची येथे फसवणूक झाल्यानंतर ही घटना उजेडात आली आहे.

# पिडीतेवर अत्याचाराच्या आरोपातून राधेश्याम कोळी यांची निर्दोष मुक्तता

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

शिंदखेडा तालुक्यात साळवे येथील राधेश्याम चतुर कोळी (बोरसे) यांची धुळे येथील मे. जिल्हा व सत्र न्यायाधिश सो.यास्मीन देशमुख मॅडम यांनी दिनांक ३०/०१/२०२४ रोजी पिडीतेवर पळवुन नेवुन अत्याचार केल्याच्या आरोपातुन निर्दोष मुक्तता केली.

फिर्यादी पिडीत हिने शिंदखेडा पोलिस स्टेशन येथे दि. १७/०६/२०१४ रोजी भा.द. वि. कलम ३७६, ३६३,३६६ (-), ५०६ सह लहान मुलांचे लैगींक अत्याचारापासुन संरक्षण अधिनियम २०१२ (पोस्को) चे कलम ३,४,६, प्रमाणे गु.र. नं. ७०/२०१४ अन्वये आरोपी यांने दि. २९/०५/२०१४ रोजी सायंकाळी १७:०० वाजेच्या सुमारास पळवुन नेवुन नवसारी गुजरात येथे नातेवाईकांकडे नेऊन तसेच सिन्नर, नाशिक येथे पळवुन घेवुन जावुन पिडीतेस आपण पती-पत्नी आहोत असे भासवुन तिच्यावर बळजबरीने वेळोवेळी अत्याचार केला. या वरुन तात्कालीन पोलिस उपनिरीक्षक सो. वंसत भिकाजी सोनवणे यांनी तपास करुन मे. कोर्टात दोषारोप पत्र दाखल केले व सदरच्या केसचे धुळे येथील मे. जिल्हा व व सत्र न्यायालयात न्यायमुर्ती मा. यास्मीन देशमुख मॅडम यांच्या कोर्टात कामकाज चालले. सदर कामी फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार भगवानसिंग सत्तारसिंग गिरासे, डॉ. रमेश काशिनाथ गठरी, सरला छाबीलाल पवार (पोलिस शिपाई) वसंत भिकाजी सोनवणे (पोलिस उपनिरीक्षकसो.) शिंदखेडा पोलिस स्टेशन तपासी अधिकारी, एकुण ७ साक्षीदार तपासलेत मे. कोर्टाने युक्तीवाद ग्राहय धरुन आरोपीला संशयाचा फायदा देवुन निर्दोष सोडले.सदर कामी ॲड. आनंद एस जगदेव यांना ॲड. किशोर बी. परदेशी, ॲड. वैभव व्ही. साळवे, ॲड. महेश पी. काबंळे, ॲड. रेखा सोनार, यांनी सहकार्य केले.

# महासंस्कृती महोत्सव यशस्वी करण्यासाठी सुक्ष्म नियोजन करावे : जिल्हाधिकारी गोयल

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

स्थानिक कलाकारांसाठी व्यासपीठ, लुप्त होत चाललेल्या कला, संस्कृतीचे जतन व संवर्धन तसेच स्वातंत्र्य लढ्यातील ज्ञात अज्ञात लढवय्यांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने धुळे जिल्ह्यात पाच दिवसीय महासंस्कृती महोत्सवाचे आयोजन केले जाणार आहे. हा कार्यक्रम जिल्ह्यात यशस्वी करण्यासाठी सर्व विभागांनी सुक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिले.



महासंस्कृती व महानाट्य महोत्सव निमित्त आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील सातपुडा सभागृहात जिल्हाधिकारी श्री. गोयल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता विवेक नवले, अपर पोलीस अधिक्षक किशोर काळे, निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, उपविभागीय अधिकारी राहुल जाधव, उपजिल्हाधिकारी महेश जमदाडे, मनपाच्या अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भाऊसाहेब अकलाडे, हेमंत भदाणे, कार्यकारी अभियंता आर.आर. पाटील, मनपा उपायुक्त संगिता नांदुरकर, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका शिल्पा नाईक, जिल्हा परिषदेचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी मनिष पवार, जिल्हा माहिती व सूचना विज्ञान अधिकारी महेश खडसे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी जितेंद्र सोनवणे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. गोयल म्हणाले की, राज्य शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागातर्गत हा महोत्सव प्रत्येक जिल्ह्यात आयोजित केला जात आहे. शासन निर्णयान्वये या महासंस्कृती महोत्सवाच्या आयोजन व सुयोग्य नियोजनासाठी समन्वय व सनियंत्रण समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीने हा पाच दिवशीय महोत्सव कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नियोजन करावे. महासंस्कृती महोत्सवात पुस्तक प्रदर्शन, छायाचित्र प्रदर्शन, पोर्स्टर प्रदर्शन, चित्रकला प्रदर्शन, बचतगट उत्पादन, वस्त्र संस्कृती दालन, शस्त्र प्रदर्शन, पर्यटन दालन, महाराष्ट्राचे संस्कृती दर्शविणारे कार्यक्रम, शिवचरित्रावर आधारीत सांस्कृतिक कार्यक्रम, लोककलेतील विविध प्रकार, पोवाडा, भारुड, गोंधळगीत, स्थानिक दुर्मिळ आणि लुप्त होत असलेल्या लोककला व संस्कृती कार्यक्रम, खानदेशातील वहीगायन, कविता, मर्दानी खेळ, शिवकालीन लोककला इत्यादी भरगच्च कार्यक्रम पाच दिवसासाठी आयोजित करण्यात येणार असल्याने हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी समितीने सुक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिल्यात.

# जय भवानी रोडवर मध्यरात्री गोळीबार : नागरिकांमध्ये भीती

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

शहरात मध्यरात्री गोळीबाराची घटना घडली आहे. संशयितांनी दोन राऊंड फायर केले आहेत. जय भवानी रोडवर ही घटना घडली आहे. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. फायर केल्यानंतर संशयितांनी घटनास्थळावरून पळ काढला. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नाशिकच्या जय भवानी रोड परिसरातील साई श्रद्धा अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या राहुल उज्जैनवाल सोबत झालेल्या जुन्या भांडणाच्या कारणावरून उज्जैनवाल कुटुंबीय मध्यरात्री झोपलेले असताना अचानक त्यांच्या इमारतीखाली येऊन एका टोळक्याने हातात कोयते घेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.त्यानंतर संशयितांनी काचेच्या बाटल्या फोडण्यात. एवढेच नाही तर काही वेळाने संशयितांकडून राहुलला समोर आणा त्याचा मुडदाच पाडतो, अशी धमकीही देण्यात आली. तसेच पिस्तूलमधून दोन राऊंड फायर करण्यात आले. त्यानंतर संशयितांनी घटनास्थळावरून पळ काढला. या घटनेमुळे नाशिक शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

## रेल्वे अर्थसंकल्पात आधुनिकीकरणावर भर

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी देशाचा अंतरिम अर्थसंकल्प संसदेत सादर केला. या अर्थसंकल्पात रेल्वेसाठी अंतर्भूत करण्यात आलेल्या तरतुदींची भारतीय अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका आहे. त्यामुळेच सर्वांचेच लक्ष रेल्वेसाठीच्या तरतुदींकडेही लागले होते. सुरक्षा, पायाभूत सोयी-सुविधांच्या सुधारणा, नवीन ट्रेन्स लॉन्च आणि रेल्वे स्थानकांचा कायापालट याकडे बजेटमध्ये लक्ष देण्यात आले आहे. यंदाच्या अंतरिम अर्थसंकल्पामध्ये महाराष्ट्रासाठी १५ हजार ५५४ कोटी रुपयांची घसघशीत अशी तरतूद करण्यात आली आहे. मागील वर्षी महाराष्ट्रात रेल्वेसाठी १३ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. पण यंदाच्या अंतरिम असलेल्या अर्थसंकल्पात रेल्वेसाठी वाढीव तरतूद केली आहे, ही महाराष्ट्रासाठी मोठी जमेची बाजू आहे. या अर्थसंकल्पातून महाराष्ट्रातील रेल्वे मार्गिकांसाठी भरघोस निधी देण्यात येईल, असे चित्र आहे. नव्या रेल्वे मार्गिकांसोबतच कसारा, कर्जत आणि पुणे या रेल्वे यार्डांचे नूतनीकरणही केले जाणार आहे. सीएसएमटी या सर्वात मोठ्या आणि महत्त्वाच्या टर्मिनससोबत एलटीटीच्या विकासासाठीदेखील निधी दिला जाणार आहे. म्हणजेच महाराष्ट्रातील एकूण सहा नवीन मार्गिकांसाठी खास तरतूद करण्यात आली आहे. त्यासाठी जवळपास १ हजार ९४० कोटी रुपये खर्च केले जाणार असल्याने अर्थसंकल्पात आधुनिकीकरणावर भर दिल्याचे दिसते. महाराष्ट्राला बजेटमध्ये रेल्वेसाठी नेमके काय मिळाले? याविषयी सर्वसामान्य मुंबईकरांसह रेल्वेतून प्रवास करणाऱ्या सर्वांनाच कुतूहल आहे. त्यातच अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे घड्याळाच्या काट्यावर धावणाऱ्या कष्टकरी मुंबईकरांचा केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने गांभीर्याने विचार केलेला दिसला. म्हणजेच मुंबईकरांसाठी आवश्यक असणाऱ्या वेगवेगळ्या सुविधा पुरविण्यासाठी मुंबई रेल विकास कॉर्पोरेशनची स्थापना करण्यात आली आहे. या संस्थेमार्फत मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट हाती घेण्यात आले आहेत. त्यापैकी एमयूटीपी १ पूर्ण झाला असून २, ३ आणि ३ ए हे अन्य प्रकल्प बाकी आहेत. त्यामध्ये जितके पैसे रेल्वे देणार आहे, तितकेच पैसे राज्य सरकारदेखील एमआरव्हीसीला देणार असल्याचे ठरले आहे. मुंबईकरांसाठी असलेल्या मुंबई रेल विकास कॉर्पोरेशनच्या एमयूटीपी प्रकल्पांना आतापर्यंत चांगला निधी मिळाला आहे. एमयूटीपी दोन प्रकल्पांना १०० कोटी मिळाले आहेत. त्यामध्ये जवळपास सर्व प्रकल्प पूर्ण झाले असून, काही प्रकल्पांची थोडी कामे बाकी आहेत. तसेच उर्वरित प्रकल्प यांच्यासाठी तरतूद केली गेली आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कुर्ला या ५व्या आणि ६व्या मार्गिकेसाठी तरतूद करण्यात आली आहे. तसेच मुंबई सेंट्रल ते बोरिवली या सहाव्या मार्गिकेसाठी देखील काम सुरू करण्यात आले आहे. म्हणजेच हे प्रकल्प पूर्णत्वास गेल्यास मुंबईकरांचे लोकल प्रवासातील हाल बऱ्याच अंशी कमी होतील, हे निश्चित. एमयूटीपीच्या ३ऱ्या प्रकल्पाला ३०० कोटी मिळाले असून, त्यात विरार-डहाणू या मार्गाचे चौपदरीकरण करण्यात येणार आहे, तर पनवेल ते कर्जत ही नवीन रेल कॉरिडॉर उभारली जाणार आहे. तसेच ऐरोली ते कळवा या नवीन उन्नत मार्गाचे कामही हाती घेतले जाणार आहे. नवीन लोकल गाड्या (नॉन एसी) सुरू केल्या जाणार आहेत. रेल्वे गाड्यांची गती वाढविल्यास रुळांवर मोठा ताण पडून अपघात होण्याची दाट शक्यता असते. हा संभाव्य धोका टाळण्यासाठी किंवा तो रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजण्यात येणार आहेत. 'एमयूटीपी ३ ए' प्रकल्पासाठी ३८८ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या तरतुदीमुळे गोरेगावपासून बोरिवलीपर्यंतच्या महत्त्वाच्या अशा हार्बर मार्गाचा विस्तार होणार आहे. या मार्गामुळे पश्चिम उपनगरे ही हार्बर मार्गाशी जोडली जाणार आहेत. तसे झाल्यास दोन्ही बाजूंचे प्रवासी दोन्ही मार्गांवर सहजगत्या प्रवास करू शकणार असल्याने सध्या त्यांना होणारा मनस्ताप खूप मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. तसेच बोरिवली आणि विरार या अहोरात्र भरूभरून वाहणाऱ्या मार्गांदरम्यान आता पाचवी आणि सहावी मार्गिका तयार झाल्यास पश्चिम रेल्वेच्या या मार्गावर सतत होणाऱ्या गर्दीला आळा बसेल आणि प्रवाशांचा त्रास कमी होईल.

# आर्थिक दृष्ट्या मागास(EBC) विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रश्न व उपाय

१९९० नंतर संपूर्ण महाराष्ट्रात इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेश घेण्याचे प्रमाण वाढले. गेल्या दहा पंधरा वर्षात संपूर्ण महाराष्ट्रात शहरी तसेच ग्रामीण भागात सरकारी मराठी माध्यमाच्या अनुदानित शाळा उपलब्ध असताना व त्यामध्ये मोफत प्रवेश शिक्षण असताना सुद्धा सर्व स्तरातील पालकांचा आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमाला प्रवेश घेण्याचे प्रमाण वाढले आहे. महाराष्ट्रातील बहुतांश पालकांचे वार्षिक उत्पन्न एक लाखापासून चार लाखापर्यंत आहे. बहुतेक इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे शुल्क वीस हजारापासून एक लाख रुपयापर्यंत आहे. मध्यम शुल्क आकारणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे शुल्क ४० ते ५० हजार रुपये आहे. दोन मुले असलेल्या पालकांना आपल्या मुलांची वार्षिक एक लाख रुपये शुल्क भरणे फारच अवघड जाते. बहुतेक पालक कर्ज काढून मुलांची शाळेचे शुल्क भरतात.

संपूर्ण महाराष्ट्रात इंग्रजी माध्यमाच्या शाळांना अनुदान नाही. शिक्षणाचा अधिकार म्हणजेच आरटीई अंतर्गत गरीब विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतो, परंतु त्यातही अनेक अडचणी आहेत व आर टी ई अंतर्गत चे पैसे महाराष्ट्र सरकारने गेले पाच वर्षे दिलेले नाहीत. महाराष्ट्रातील बहुसंख्य पालकांचा उत्पन्नातील जवळजवळ अर्धा हिस्सा मुलांच्या इंग्रजी माध्यमातील शाळांची फी भरण्यात जातो. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जरी मातृभाषेतून शिक्षण दिले पाहिजे असे सांगते तसेच जगभर संशोधनातून मातृभाषेतील शिक्षण अधिक प्रभावी असते असे आढळून आले आहे, तरी इंग्रजी माध्यमाच्या शाळांना प्रवेश घेण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढते आहे ही मात्र वस्तुस्थिती आहे.

संपूर्ण भारतात भारत सरकारच्या दोन हजार सीबीएसई शाळा व नवोदय शाळा अशा एकत्रित ४ हजार सीबीएसई च्या केंद्रीय शाळा आहेत. पालकांचा इंग्रजी माध्यमाचा कल बघता व महाराष्ट्र शासनाचे इंग्रजी माध्यमाच्या शाळांना अनुदान न देण्याचे धोरण बघता, भारत सरकारने भारतातील १५० कोटी लोकांकरता, प्रत्येक लाखाला एक याप्रमाणे पंधरा हजार सीबीएसईच्या अनुदानित केंद्रीय शाळा काढाव्यात. कोणत्याही अनुदानित इंग्रजी माध्यमाच्या सीबीएसईच्या शाळांमधील अंतर २० किलोमीटर पेक्षा जास्त असू नये, असे बघावे.

महाराष्ट्र शासनाने आठ लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या सर्व ईबीसी म्हणजेच आर्थिक दृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना प्ले ग्रुप पासून त्यांनी जर इंग्रजी माध्यमाच्या शाळांना प्रवेश घेतला असेल तर वीस हजार रुपये प्रत्येक पाल्यामागे पालकाला द्यावेत. सरकार तर्फे ईबीसी विद्यार्थ्यांची फी शाळेत जमा केली जावी. मराठी माध्यमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमागे महाराष्ट्र शासन सरासरी २० हजार रुपये खर्च करीत आहेच.

सध्या संपूर्ण महाराष्ट्रात व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या ईबीसी विद्यार्थ्यांना सरकारतर्फे अर्धी फी दिली जाते तसेच नुकत्याच सरकारने जाहीर केलेल्या जीआर नुसार वसतीगृह व भोजन भत्त्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणापासून तालुक्याच्या ठिकाणापर्यंत सरकार ६० हजारांपासून ३८ हजारापर्यंत विद्यार्थ्यांना वसतीगृह व भोजन भत्ता देणार आहे .याबद्दल सरकारचे अभिनंदन केले पाहिजे. सरकारचा हा निर्णय संपूर्ण महाराष्ट्रात बहुसंख्येने असलेल्या ईबीसी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती करता क्रांतिकारी निर्णय आहे. परंतु व्यवसायिक महाविद्यालयांची अर्धी देखील फी देणे ईबीसी विद्यार्थ्यांच्या पालकांना शक्य होत नाही. त्यामुळे सर्वच ईबीसी विद्यार्थ्यांना म्हणजेच आठ लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या पालकांच्या पाल्यांना सरकारने सर्व प्रकारच्या व्यवसायिक अभ्यासक्रमा करता पूर्ण फी द्यावी.

यावर्षी भारतातून १५ लाख विद्यार्थी परदेशात शिकायला गेले. मागील वर्षी १२ लाख विद्यार्थी गेले होते. १९९० नंतर इंग्रजी माध्यमाच्या शाळा तसेच आयटी शिक्षणाचा प्रचार व प्रसार यामुळे परदेशात शिक्षणासाठी व नोकरीसाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. भारत सरकारच्या अधिकृत आकडेवारीनुसार सव्वातीन कोटी भारतीय परदेशात राहतात. भारत सरकारच्या अधिकृत आकडेवारीनुसार मागील वर्षी परदेशात राहणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांनी भारतात दहा लाख कोटी रुपये पाठवले.

या पाठवलेल्या रकमेची चार प्रकारे विभागणी करता येईल

१.आपल्या भारतातील कुटुंबासाठी पाठवलेले पैसे

२.परदेशी शिक्षणासाठी भारतीय बँकेतून घेतलेल्या कर्जाची परतफेड म्हणून पाठवलेले पैसे

३.भारतात स्थावर मालमत्ता घेण्याकरता पाठवलेले पैसे

४.भारतीय भांडवली बाजारात केलेली गुंतवणूक

यातील चौथ्या प्रकारातील पैसे फक्त परत जातात. म्हणजेच भारताच्या विकासाला परदेशात राहणारी भारतीय मोठ्या प्रमाणावर पाठबळ देत आहेत.



शब्द संवाद

प्राचार्य प्रशांत पाटील

(नाशिक) मो.९५११८५९९३९

परदेशात राहणाऱ्या सव्वातीन कोटी भारतीयांची संपत्ती इंग्लंड मधील सर्व लोकांच्या संपत्तीपेक्षा जास्त झाली आहे. येणाऱ्या दहा वर्षात परदेशात राहणाऱ्या भारतीयांची संख्या दहा कोटी होणार आहे व त्यांच्याकडची संपत्ती अमेरिकेच्या एकूण लोकांच्या संपत्ती पेक्षा जास्त असणार आहे.

जगभराच्या उत्कृष्ट शैक्षणिक संस्थांमध्ये उत्तम शिक्षण घेणे हा प्रत्येकाचा हक्क आहे. परंतु ईबीसी कॅटेगिरीतल्या विद्यार्थ्यांना, बँका सहजपणे इतर विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज देतात, तसे घेणे शक्य होत नाही. कारण ईबीसी विद्यार्थ्यांच्या पालकांकडे बँकांकडे गहाण ठेवण्यासाठी स्थावर मालमत्ता नाही. गेल्या ३० वर्षात परदेशात शिकायला गेलेल्या विद्यार्थ्यांनी शिक्षणाकरता घेतलेल्या कर्जाची परतफेड मोठ्या प्रमाणावर केली आहे. त्याचबरोबर भारताच्या विकासाला मोठा हातभार लावला आहे. त्यामुळे ईबीसी कॅटेगिरीतल्या विद्यार्थ्यां करता भारतात तसेच भारताबाहेर शिक्षण घेण्याकरता, त्यांच्या पालकांकडे गहाण ठेवायला कोणतीही मालमत्ता नसल्यामुळे, कोणतेही तारण न घेता शैक्षणिक कर्ज द्यावे. ईबीसी विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना कर्जावरील व्याज माफ करावे.

ईबीसी विद्यार्थ्यांवर होणारा खर्च, हा खर्च न समजता पायाभूत क्षेत्रातील गुंतवणूक समजावी, त्यामुळे उद्याच्या भारताच्या विकासात बहुसंख्येने असलेले ईबीसी कॅटेगिरी विद्यार्थी फार महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात.

भारत जागतिक शक्ती व्हायची असेल तर बहुतांश आर्थिक स्थिती नसलेल्या महाराष्ट्रातील व भारतातील ईबीसी कॅटेगरीतल्या विद्यार्थ्यांना शालेय, महाविद्यालयीन तसेच परदेशातील शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर मदत करायला हवी.

१. शालेय स्तरावर सर्व ईबीसी विद्यार्थ्यांच्या किमान २० हजार रुपये दरवर्षी शाळेचे शुल्क देण्यात यावे.

२. सध्या भारत सरकारच्या ४ हजार सीबीएसई माध्यमाच्या केंद्रीय शाळा, दीडशे कोटी लोकसंख्येसाठी, प्रत्येक एक लाख लोकसंख्येमागे एक, या प्रमाणात वाढवून १५ हजार अनुदानित सीबीएसई केंद्रीय शाळा करण्यात याव्यात. कोणत्याही केंद्रीय शाळेचे एकमेकांपासून अंतर वीस किलोमीटर पेक्षा जास्त असू नये.

३ सर्व प्रकारच्या व्यवसायिक अभ्यासक्रमा साठी विद्यार्थ्यांना संपूर्ण फी सरकारतर्फे देण्यात यावी.

४.भारतात तसेच परदेशात शिक्षण घेण्यासाठी ईबीसी विद्यार्थ्यांना बँकांनी कर्ज देताना कोणत्याही प्रकारचे तारण ठेवण्याची अट काढून टाकावी व महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाने या कर्जाची जबाबदारी घ्यावी.

ईबीसी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कर्जावरील व्याज, शिक्षण पूर्ण होईपर्यंत महाराष्ट्र सरकार तसेच भारत सरकारने भरावे. शिक्षण पूर्ण झाल्यावर ईबीसी कर्जाची परतफेड करतीलच. याबाबत महाराष्ट्र सरकार व भारत सरकारने लवकरात लवकर विद्यार्थी हिताचा निर्णय घेऊन विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा.

# विद्यार्थ्यांवर 'असर' नेमका कशाचा?

भारतीय युवकांच्या मनावर डिजिटल माध्यमांनी गारूड केले असून, त्याचा शैक्षणिक प्रगतीवर वाईट परिणाम होताना दिसून येतो अशी ओरड सध्या ऐकायला मिळते. कारण 'असर' संस्थेच्या सर्वेक्षणातून हे सत्य समोर आले आहे की, आजही देशात ग्रामीण भागातील ८ वी ९ वीच्या अनेक मुलांना नीट लिहिता - वाचता देखील येत नाही. 'असर'च्या या संशोधनातून शिक्षणावर होणारे अनेक 'असर' म्हणजे 'परिणाम' किंवा 'प्रभाव'अधोरेखीत होतात. त्यांची व्याप्ती खूप मोठी आहे. मग या मुलांच्या प्रगतीवर नेमका कशाचा 'असर' झालाय याचे कुतूहल प्रत्येकाच्या मनात आहे.


'असर' या संस्थेने भारतातील ग्रामीण भागांमधील १४ ते १८ वर्षांच्या युवकांवर लक्ष केंद्रित करून केलेल्या २०२३च्या सर्वेक्षणात सुमारे २५ टक्के युवकांना आपल्या मातृभाषेतील इयत्ता दुसरीच्या पुस्तकातील धडा वाचता येत नव्हता. ही बाब आधुनिक भारताच्या प्रगतीला निश्चितच मारक आहे. डिजिटल युगात प्रगतीच्या वारूवर स्वार होताना मातृभाषेतून चार ओळी वाचता येऊ नये, असे असताना दुसरीकडे मात्र अनेक शाळांमध्ये रोबोटिक्स आणि कोडिंगचे प्रशिक्षण दिले जाते आहे. विद्यार्थ्यांची कार्यकुशलता वाढविण्यावर भर दिला जात आहे. एकूण हा अहवाल आल्यानंतर आपल्या शिक्षण व्यवस्थेचे चांगलेच वाभाडे निघाले. त्यानंतर काही दिवसांतच राज्य सरकारने नवे धोरण आखले.

शाळांच्या अचानक भेटी दरम्यान जर विद्यार्थी कमकुवत आढळला, तर त्याची जबाबदारी आता शिक्षकांवर असेल, ज्या शिक्षकांच्या वर्गातील विद्यार्थ्यांची गुणवत्त कमी आढळून येईल, अशा शिक्षकांना प्रशिक्षणासाठी पाठवण्याच्या सूचना राज्य सरकारने केल्या आहेत. या भेटीचा आढावा दर महिन्याला घ्यावा लागणार आहे. तसेच केंद्र प्रमुखांना अचानक भेटी देण्याच्या सूचना देखील देण्यात आल्या आहेत. 'असर'च्या सर्वेक्षणात राज्यातील नांदेड ग्रामीणमधील ६० गावांतील १,३७४ युवकांची निवड करण्यात आली होती. त्यामध्ये कृती, कौशल्य, मूलभूत क्षमता तसेच डिजिटल साक्षरता व कौशल्य हे प्रमुख निकष ठेवण्यात आले होते. यामध्ये भूलभूत कौशल्य व डिजिटल साक्षरतेमध्ये राज्याची कामगिरी निराशाजनक आढळली होती; परंतु ही निराशा आत्ताचीची आहे असे नाही. अनेक दशकांपासूनचा हा प्रश्न आजही कायम आहे. कारण शिकणे आणि शिकवणे याचा समन्वय साधण्यासाठी मुलांना शिकण्याची आवड असावी लागते. तसेच सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक, भौगोलिक बाबींचाही संबंध यामध्ये येतो. शाळेतील वातावरण, शिक्षक आणि संस्थांची धोरणे, सरकारी नियम देखील याला कारणीभूत ठरतात. मधल्या काही काळात तर ग्रामीण शिक्षकांवर शाळाबाह्य कामांचे ओझे देखील होते. त्याचा साहजिकच शिकवण्यावर परिणाम होत होता हे विसरून चालणार नाही. आता तर महाराष्ट्रात अनेक जिल्हा परिषदांच्या शाळा एक शिक्षकी बनल्या आहेत. एकच शिक्षक १ ली ते चौथीपर्यंत वर्ग शिकवतो. तसेच अनेक शाळा दुर्गम भागात आहेत, तर अनेक शाळा मोडकळीस आल्या आहेत, तर काही पावसाळ्यात शाळा गळतात देखील, या सगळ्याचा परिणाम विद्यार्थ्यांवर होतो हे दुर्लक्षून चालणार नाही.

'असर' संस्थेचा शैक्षणिक रिपोर्ट प्रासार माध्यमांनी दाखवला आणि आपली मराठी शाळा आठवली. कारण या बातमीनंतर मन भूतकाळात डोकावू लागले. 'छडी लागे छमछम विद्या येई घमघम' ही पूर्वीची एक म्हण यानिमित्ताने आठवली. आता तर शिक्षकांच्या हातातली ती छडी गायब झाली आहे. काही वर्षांपासून पालकांनी केलेल्या तक्रारीमुळे शिक्षकांना धड रागावताही येत नाही. तसा कायदा तयार करण्यात आला आहे. कारण काही आगावू शिक्षकांनी लेकरांना बेदम मारहाण केली. काहींनी तर अक्षरश: मुलांना बदडूनही काढले. त्याच्यांमुळे शिक्षकांच्या अनावर रागावर नियंत्रण आले खरे; पण मुलं आता कुणालाच दाद देईनाशी झाली आहेत. त्यातच मुलांची घोकंपट्टीही कमी झाली आहे. **क्रमश:**

**- रूपाली केळस्कर**

## शब्दकोडे-३११



**आडवे शब्द :**

१. हाती घेतलेले काम पूर्ण करा, या अर्थाचा सुविचार ७. हिशोबाची वही ११. चेष्टा १२. क्रिकेटमधील धाव १३. बोटावरील आवरण १४. ठोक! हाण! १५. ललाट १६. कौतुक (ग्रामीण) १८. वय लपवणारा रंग १९. सरहद्द २०. पुष्कळ २२. हालणे, बाजूला होणे २३. संगीतातील लकेर २४. मोळी, गवताची पेंडी २५. घरोब्याचे २७. मालक २८. वसवलेली वस्ती ३०. सोज्वळ, प्रामाणिक ३२. रत्न ३४. चकचकीत, स्वच्छ ३७. पोपट ३८. बेहिशोबी, पुष्कळ ४१. खांदा, खांद्याचे हाड ४१अ. लटकवणे, चिकटवणे ४२. लोखंड घासण्याचे हत्यार ४३. पद्धतीनुसार ४४. अग्री ४७. अवधान, लक्ष ४८. बेताचे गरम ४९. छिद्रातून, खिडकीतून पडणारे ऊन ५०. नंतर ५१. गुच्छाने आलेले ५२.. उत्तराधिकारी ५४. योग्यता, लायकी ५६. युद्ध ५८. सांगणे ५९. किंमत ६०. अर्धी ओंजळ ६२. दोन्ही बाजूने घातक शस्त्र ६३. छोटा, बारीक ६६. साखरेचा रस ६८. वाढलेला व्याप ६९. हिंदीत पर्यंत, मराठीत प्रतीक्षा ७१. देवांचा राजा ७२. गुप्त रस्ता ७४. निर्धन ७६. बातमी ७८. डोंगर ७९. खबदाड ८०. चटकन, त्वरित

**उभे शब्द :**

१. बाजार २. धनुष्यबाण ३. बडबडी, लोचट स्त्री ४. सरस, नीरस अशी भावना ५. विद्यापीठातील विभागप्रमुख ६. न्यायासंबंधी ८. वडील ९. खुंटी १०. शिजवताना पदार्थ जळणे १४. धनी-धनीण १७. अंधार १८. हात १९. राम-रावण युद्धाला कारणीभूत ठरलेले रावणाचे कृत्य २१. चांगले वाईट २२. दक्षकन्या २६. गुरे राखणारा २७. श्रीमंत २९. समशेर ३१. संपुष्टात येणे ३३. आईचा भाऊ ३५. दुष्ट ३६. त्वरित, लगेच ३९. घोड्यांच्या शर्यतीची जागा (इंग्रजी) ४०. धोबी ४१. अफूचे बी ४२. कानात सांगितलेला सल्ला ४४. ब्रेड ४५. समुद्रातील अग्री ४९. एकदम नवीन ५०. भिस्त ५०अ. फळातील खाद्य ५१. काळजी, चिंता ५३. घर ५४. झाडाची पाने, काड्या इ. ५५. ज्वर, दाह ५७. मुघल वास्तुकलेचे वैशिष्ट्य ६१. भेग, चीर, पोकळ जागा ६२. सकाळी बारानंतरची वेळ ६४. चलनवलन ६५. चंद्राची कड ६७. टॅक्स (मराठी) ७०. वाळवी ७३. मांजरीचा भाचा ७४. स्थिती, दशा ७५. बगळा ७७. आवाज, ध्वनी

### शब्दकोडे-३१० चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.चलनवलन ४.जिवावर उदार होणे १०.कव ११.नवरंग १२.तळ १३.हिमालय १५.लवा १६.हजर १८.नवा १९.अगरबत्ती २१.समरस २४.तम २६.आम २७.नारद २८.सकाळ दुपार संध्याकाळ ३१.शीतकर ३३.कुल ३४.तन ३५.पात ३६.लत ३७.तलमसुती ३८.विनंती ३९.वाईट ४१.बाप ४२.चाकर ४४.लडिवाळ ४६.कर्जबाजारी ४८.चरस ४९.भला ५०.दादर ५२.गो ५३.सणवार ५५.शरम ५६.धनुष्यबाण ५७.डीन ५८.दारू ६१.कच ६३.वेताळसेना ६६.टीका ६७.मरगळणे ७१.रजत ७२.मनमुराद ७३.नीरस

**उभे उत्तर**

१.चकचकीत २.लव ३.वर्तमानकाळ भूतकाळ भविष्यकाळ ४.जिवलग ५.वारंवार ६.वग ७.उमज ८.रत ९.होळकर १४.लवा १६.हत्ती १७.रसरशीत १९.अमर २०.बरका २२.मदत २३.समोर २५.मसलत २६.आपादमस्तक २९.संतती ३०.ध्यान ३२.कसाई ३३.कुलशील ३५.पातीचा चहा ३८.विपरीत ३९.वारसदार ४०.टणत्कार ४१.बाजा ४३.कर ४५.डिब्बा ४७.बालवाडी ५१.दमदाटी ५३.सणक ५४.रनवे ५४अ.टवाळ ५५.शबाना ५९.रुकावट ६०.समर ६२.चलन ६४.ताकद ६५.सेनानी ६८.रज ६९.गत ७०.कोस

## विकासकामे अन् कागदावरच्या शासकीय योजना!

त्या विकासकामांचा निश्चितच दर्जा तपासावा लागेल. तो दर्जा सुधारला तर असंख्य विकासकामे कोकणात झाल्याचे दिसून येतील. एकिकडे विकासकामे होत असली तरीही केंद्र व राज्य सरकारच्या योजना तळा-गाळापर्यंत पोहोचतच नाहीत. अनेक शासकीय योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचलेल्या नसतात. एकतर कोकणातील जनता 'गजाली'मध्ये रमणारी असली तरीही शासकीय योजना कोणत्या आहेत, त्या योजनांचे लाभ कसे घ्यावेत, सर्वसामान्य जनतेसाठी कोणत्या योजनांचा लाभ होऊ शकतो त्यासाठी आपण काय करणे आवश्यक आहे, याची माहितीच नसते. प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ जास्तीत-जास्त लोकांना देण्यासाठी कधीही उत्सुक नसतात.

याउलट लाभार्थ्यांपर्यंत ती माहिती कशी पोहोचणार नाही, याची जणू व्यवस्थाच करण्यात आलेली असते. जेव्हा कोकणातील लोकांना काही काम-धंदा करायलाच नको, असे आपण म्हणतो तेव्हा एखाद्या योजनेचा लाभ घेण्यासाठी जर कोणी पुढाकार घेऊन प्रपोजल तयार करण्याचा प्रयत्न केला, तर शासकीय कार्यालयातून अडवणूक ही ठरलेलीच असते. यामुळे आधीच फार उत्सुक नसलेला कोकणवासीय योजनेचा लाभ घेण्याच्या फंदात पडत नाही. शासनाच्या असंख्य चांगल्या योजना आहेत. अनेक योजनातून सर्वसामान्य जनतेचे संसार फुलू शकतात. कुटुंब उभी राहू शकतात; परंतु या योजना लोकांपर्यंत पोहोचत नाहीत. पूर्वी गावो-गावचे कार्यकर्ते या अशा योजनांची माहिती गावातील ग्रामस्थांपर्यंत पोहोचवायचे. लाभार्थ्यांच्या कागदपत्रांची पूर्तता करत परिपूर्ण प्रस्ताव शासकीय कार्यालयात जायचे. यामुळे शासकीय योजनांचा लाभ चांगला मिळायचा. आता शासकीय कार्यालयातील ऑनलाइन-ऑफलाइनच्या कार्यपद्धतीत सामान्य जनतेचा जीव मेटाकुटीस येतो. साधा तहसीलदार कार्यालयात कुठलेही दाखले घेण्यासाठी जो काही छळ मांडला जातो, त्यामुळे दाखला नको पण हेलपाटे नको अशी म्हणण्याची वेळ सामान्य शेतकऱ्यावर येते. 'नेटवर्क' नाही हे कारण सांगून सामान्य शेतकऱ्याला त्रास देणारे कारकून आजही शासकीय कार्यालयातून दिसतात.

एखाद्या दाखल्यासाठी पाच मिनिटांत होणार असेल तरीही दहा-पंधरा वेळा फेऱ्या मारायला लावण्यात शासकीय कार्यालयातील या रावसाहेब भाऊसाहेबांना कोणता आनंद मिळतो कुणास ठाऊक! खरंतर सामाजिक, राजकीय कार्यकर्त्यांनी शासकीय योजनांची माहिती घेऊन गावातील कोणत्या योजनेचा लाभ कोण घेऊन शकतो, याचा विचार करून लाभार्थी संख्या कशी वाढेल हे पाहिले पाहिजे. यासाठी संवेदनशील कार्यकर्ता असला पाहिजे. तरच त्यातून चांगल काही घडू शकेल. नेहमीच विकासकामे आणि शासकीय योजना यांची गल्लत केली जाते. विकासकामे ही आमदार, खासदार, मंत्री या प्रयत्नातून दूरदृष्टीतून होतच असतात; परंतु शासकीय योजनांचा फायदा जास्तीत-जास्त लोकांपर्यंत होण्यासाठी हे प्रयत्न करावे लागतील तेव्हाच शासकीय सामान्यजनतेपर्यंत पोहोचू शकतील. योजनांचा लाभ घेऊन अनेक कुटुंब आर्थिक सक्षमतेने उभी राहू शकतील. **समाप्त:**

**- संतोष वायंगणकर**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

न्यूज कॉलम

## भरदिवसा साडेसात लाखाची चोरी

**मालेगाव ।** शहरातील सर्वाधिक गजबजलेल्या मोसम पुल चौकातील लोढा मार्केट व्यापारी संकुलात भरदिवसा साडेसात लाखाची चोरी झाल्याने खळबळ उडाली आहे. व्यापारी संकुलातील रेडीमेड कपड्यांच्या दुकानात खरेदी करण्यासाठी गेलेल्या तरुणाच्या दुचाकीच्या डिक्कीतून दोघा चोरट्यांनी सफाईदारपणे ७ लाख ८० हजार रुपये लंपास केले. दोघे चोरटे सीसीटीव्हीत कैद झाले आहेत. शुक्रवारी (ता. २) सायंकाळी साडेचारच्या सुमारास हा प्रकार घडला. या चोरट्यांना पकडण्याचे मोठे आव्हान छावणी पोलिसांसमोर आहे. शहर व परिसरात गेल्या काही दिवसात चोऱ्या, घरफोड्यांचे प्रमाण वाढले आहे. शेखर देवराम पवार (वय २८, रा. तळवाडे, ता. मालेगाव) हा तरुण मका व शेतमाल विक्रीतून बँकेत आलेले पैसे काढण्यासाठी आला होता.

# राज्यातील ढासळती कायदा व सुव्यवस्था बघता फडणवीस यांनी गृहमंत्री पदाचा राजीनामा द्यावा

### आम आदमी पार्टीची मागणी

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**




महाराष्ट्रात जेव्हापासून देवेंद्र फडवणीस यांनी गृहमंत्री पदाचा कार्यभार हातात घेतला आहे, तेव्हापासून राज्याची कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती बिकट झाली आहे. दिवसा-ढवळ्या खून, बलात्कार, दरोडा पडत आहेत. गृह विभागाचा कुठल्याही प्रकारचा अंकुश राहिला नसून परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात आहे, देवेंद्र फडवणीस हे राज्यात फक्त भाजपाचा प्रचार सोडून दुसरे कुठलेही काम करताना दिसत नाहीत. आज राज्यात पेपरफुटी सारख्या घटना होत आहेत. बिहार आणि उत्तर प्रदेशमध्ये ज्याप्रकारे पेपर फुटीच्या सर्रास घटना होत असतात, त्याच पद्धतीने महाराष्ट्रात सुद्धा होत आहे. असा आरोप करत आम आदमी पार्टीने उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री फडणवीस यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, गृहमंत्रालयाशी वेळोवेळी पत्रव्यवहार करून, आंदोलने, आक्रोश मोर्चा काढून सुद्धा गृहमंत्र्यांवर याचा कुठलाही परिणाम झालेला नाही. पन्नास खोके घेवून बेकायदेशीर शिंदे-फडणवीस सरकार स्थापन झाल्यापासून राज्यातील कायदा व सुव्यवस्था दिवसेंदिवस ढासळत चालली आहे. देवेंद्र फडणवीस हे भ्रष्टाचार आणि गुंडागर्दी थांबवण्यासाठी पूर्णपणे अपयशी गृहमंत्री ठरले आहेत. काल उल्हासनगरमध्ये भाजप आमदाराने पोलीस ठाण्यात गोळीबार केल्याने राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था किती ढासळली आहे, हे दिसून येते. फडणवीसांच्या संरक्षणात भाजपचा आमदार पोलीस ठाण्यात गोळीबार करू शकतो, तर राज्यातील सर्वसामान्य जनता सुरक्षित कशी राहणार? असा प्रश्न आम आदमी पार्टी मुख्यमंत्र्यांना आणि गृहमंत्र्यांना विचारत आहे, राज्यातील लोक सध्या खूपच घाबरले असून न्यायासाठी कुणाकडे जावे असाही प्रश्न करीत आहेत.

महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था सुधारण्यासाठी आणि सत्ताधाऱ्यांनी पोसलेल्या गुंडगिरीला आळा घालण्यासाठी आम आदमी पार्टीने काही मागण्या केल्या आहेत. त्यात अकार्यक्षम गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पदावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तात्काळ हटवावे. तसेच कायदा आणि सुव्यवस्था सुधारण्यासाठी कोणत्याही पक्षाच्या गुंडगिरी करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे.

भाजप नेते आणि आमदारांची गुंडगिरी थांबवण्यासाठी कारवाई करण्याची हिंमत गृहमंत्र्यांनी दाखवावी. यावेळी राज्य संघटन मंत्री नविंदर अहलुवालिया, राज्य मीडिया प्रमुख चंदन पवार, पदाधिकारी गिरीश पाटील, स्वप्निल घिया, कलविंदर गरेवाल, युवा राज्य संघटन मंत्री प्रदीप लोखंडे, अमर गांगुर्डे, विकास पाटील, गोरख मोहिते, पद्माकर अहिरे, सुमित शर्मा, विश्वजीत सावंत, संजय कातकाडे, दिपक सरोदे, नूतन कोरडे, अल्ताफ शेख आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



## राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत दिव्यांग विद्यार्थ्यांचे सुयश

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

प्रथमच नागपूर येथे झालेल्या विशेष ऑलम्पिक स्पर्धेत दोन दिव्यांग विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले. त्यांचे श्री गुरुदेव बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या सचिव प्रमिला कोकड व सहकाऱ्यांनी नाशिकरोड स्थानकात औक्षण करून स्वागत केले.

भारत महाराष्ट्र आयोजित स्टेट चॅम्पियनशिप ट्रायल कॅम्प नागपूर २०२४ आयोजित मतिमंद शाळेमध्ये दिव्य विद्यालय मतिमंद मुलांची निवासी (जव्हार) या शाळेतील पालघर जिल्ह्यातून राज्यस्तरीय खेळासाठी दोन विद्यार्थ्यांची निवड झाली होती. २१ ते २५ वयोगटातील तुषार संजय सापाटा या विद्यार्थ्याने १०० मीटर धावणे द्वितीय क्रमांक तर पळत येऊन लांब उडी या स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला, तर सागर उत्तम वाघेरे याला गोळा फेक स्पर्धेत उत्तेजनार्थक प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. राजेंद्र सूर्यवंशी व विलास चव्हाण या शिक्षकांचे यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील २६ जिल्हे सहभागी झाले होते. त्या सर्व विद्यार्थ्यांमधून दुसरे व तिसरे स्थान पटकावणे खूपच अभिमानाची व कौतुकास्पद गोष्ट आहे.

## लासलगाव रेल्वे उड्डाणपुल,लासलगाव विंचूर रस्ता लवकरच मार्गी लागणार-मंत्री भुजबळ

**लासलगाव । वार्ताहर**

राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी काल थेटाळे येथे लासलगाव बाजार समितीचे संचालक ज्ञानेश्र्वर जगताप यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.यावेळी जगताप परिवार व पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने मंत्री छगन भुजबळ यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी बाजार समितीचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर, संचालक पंढरीनाथ थोरे, ज्ञानेश्वर जगताप, सुवर्णा जगताप, उपसभापती गणेश डोमाडे, कार्याध्यक्ष भाऊसाहेब भवर, सरपंच दत्तुपंत डुकरे, दत्ताकाका रायते, डॉ.श्रीकांत आवारे, शिवाजी सुपनर, मधुकर गायकर, सरपंच शितल शिंदे, बबन शिंदे, राहुल डूमरे, उन्मेष डूमरे,तुकाराम गांगुर्डे, महिला अध्यक्षा सुरेखा नागरे, चाफेकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते. यावेळी मंत्री छगन भुजबळ यांनी उपस्थितांशी संवाद साधला. तसेच रामाचे पिंपळस ते येवला पर्यंत चौपदरी करण रस्त्याचे काँक्रीटीकरण यासाठी ५६० कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून लवकरच या कामाला सुरू सुरुवात करण्यात येईल असे त्यांनी यावेळी सांगितले.

### मंदिरातून लॅपटॉप चोरणारा पोलिसांच्या ताब्यात

**नाशिक ।** मंदिरात दर्शनासाठी आलेल्या एका भाविकांची लॅपटॉपची बॅग चोरी करणारा चोरटा इंदिरानगर पोलिसांनी ताब्यात घेत मोबाईल फोन आणि हार्ड डिस्क असा एकूण ३५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. ओंकार भीमराव कातकाडे ऑफिसला जाताना महादेव मंदिरात दर्शन घेण्यासाठी थांबले होते. या वेळी मंदिराच्या बाहेर ठेवलेली बॅग चोरट्याने घेऊन पोबारा केला होता.

## निरंकारी सद्गुरू माता सुदीक्षाजी महाराजांचे नाशिक नगरीत प्रवचन

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



संत निरंकारी मिशनच्या प्रमुख सदगुरू माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमीत जी यांचे नाशिक पावन नगरीत येत्या ४ फेब्रुवारी रोजी आगमन होत आहे. मोदी ग्राऊंड साधुग्राम मैदान तपोवन येथे सायंकाळी ५ ते ८ वाजे दरम्यान त्यांच्या पावन छत्रछायेमध्ये विशाल एकदिवसीय संत समागमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात सद्गुरु माताजी यांचे अमृतमय प्रवचन होणार आहे.

संत निरंकारी मिशनचा महाराष्ट्र समागम नुकताच नागपूर येथे मोठ्या उत्साहात साजरा झाला. समागमनंतर लगेचच माता सुदिक्षाजी महाराज ह्या नाशिक पावन भूमीत येत असल्याने संत निरंकारी भक्तांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. नागपुर नगरीत झालेल्या महाराष्ट्र समागम नंतर पहिल्यांदाच माता सुदिक्षाजी येत असून नाशिककर भाविकांनी या सत्संग सोहळ्याला उपस्थित राहून सद्गुरूंच्या दिव्य दर्शनाचा व प्रवचनाचा भाविक भक्तगणानी लाभ घ्यावा असे आवाहन संत निरंकारी मंडळ नाशिक परिक्षेत्राचे प्रमुख जनार्दन पाटील व सेक्टर संयोजक गुलाब पंजवाणी यांनी केले आहे.

## शाळा, महाविद्यालयाच्या परिसरातील टवाळखोरांचा बंदोबस्त करा

### मनसे विद्यार्थी सेनेची पोलीस आयुक्त यांच्याकडे मागणी

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



नाशिक महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. सीताराम कोल्हे यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. नाशिक शहरातील सर्व शाळा व महाविद्यालय परिसरातील टवाळखोरांचा उपद्रव, तरुणींची छेडछाड व दामिनी पथक नेमण्याबाबत तसेच अवैध पान मसाला, गुटखा विक्री करणारे यांचा बंदोबस्त करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

नाशिक शहरातील सर्व शाळा आणि महाविद्यालयाच्या परीसरात रोज टपोरी, टवाळखोर मुलांचा वावर वाढला असून त्यामुळे शाळा, महाविद्यालयात परिसरात छेडछाडीच्या घटना घडत आहेत. येणाऱ्या, जाणाऱ्या विद्यार्थीनींना शाळा, महाविद्यालयात जाणे अवघड होत आहे. परंतु ही गोष्ट घरी जर सांगितली तर घरचे शाळा, महाविद्यालयात जाणे बंद करतील म्हणून विद्यार्थिनी घाबरत शाळा, महाविद्यालयात जात आहेत. नाशिक शहरामध्ये विद्यालयांजवळ टवाळखोरांचा उपद्रव, तरुणींची छेडछाड व शाळा कॉलेजजवळ पानटपरी असल्यामुळे तरुणांना लागत असलेली व्यसने यामुळे पालक त्रस्त झाले आहेत. विद्यालय व कोचिंग क्लासेस, कॉलेजेस बाहेर टवाळखोरांचा उपद्रव, तरुणींची छेडछाडीचे प्रमाण वाढले आहे. शाळा, कॉलेज व कोचिंग क्लासेस जवळच्या परिसरात पान टपरी, बिअर, वाईन शॉपचे दुकाने असल्यामुळे शाळकरी व कॉलेजेसमधील युवक सिगारेट ,गुटखा व तंबाखूचे व्यसन करीत असतात. गांजा, एमडी ड्रग्स विक्रीची शक्यता नाकारता येत नाही. आता शहरात अवैध गुटखा, एमडी नशा करणाऱ्यांचे प्रमाण प्रचंड प्रमाणावर वाढले असून त्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थी या नशेच्या आहारी जात आहेत. तसेच सर्व शाळा व महाविद्यालयात महिला सुरक्षा हेल्पलाईन नंबर दर्शनी भागात लावण्याचे आवाहन करण्यास सांगावे आदी प्रकारच्या मागण्या करण्यात आल्या. यावेळी मनसे विद्यार्थी सेना प्रदेश उपाध्यक्ष संदीप भवर, प्रदेश कार्यकारणी सदस्य बाजीराव मते, जिल्हाध्यक्ष मनोज गोवर्धने, उपजिल्हाध्यक्ष नितीन धानापुणे, शहर अध्यक्ष ललित वाघ, शहर उपाध्यक्ष अमोल भालेराव, विभाग अध्यक्ष मेघराज नवले, अजिंक्य देवरे, गणेश शेजुळ, अविनाश जाधव, प्रसाद घुमरे आदी उपस्थित होते.




## उपलब्ध सेवा-सुविधांचे नागरिकांनी संवर्धन करावे : मंत्री छगन भुजबळ

**लासलगाव । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

नागरिकांना सर्व प्रकारच्या सेवा-सुविधा उपलब्ध होण्यासाठी विविध विकासकामांच्या माध्यमातून कामे केली जातात.या उपलब्ध झालेल्या सुविधा व वास्तू यांचे संवर्धन करणे हे प्रत्येक नागरिकाचे प्रथम कर्तव्य आहे असे प्रतिपादन राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले

शुक्रवारी निफाड तालुक्यातील पिंपळगाव नजिक, चंद्र सुर्य मंदिर मरळगोई रोड व भरवज फाटा येथील विविध विकास कामांचे भूमीपूजन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी गटविकास अधिकारी महेश पाटील, विधानसभा अध्यक्ष वसंत पवार,कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर शेवाळे,भाऊसाहेब भवर,बाजार समितीचे संचालक पंढरीनाथ थोरे,ज्ञानेश्वर जगताप,डॉ.श्रीकांत आवारे, मंगेश गवळी,सीताराम आंधळे,सरपंच सचिन दरेकर, सरपंच काशिनाथ माळी,निवृत्ती जगताप,उपसरपंच लतिफ तांबोळी,माधव जगताप यांच्यासह अधिकारी व नागरिक उपस्थित होते. मंत्री छगन भुजबळ यावेळी म्हणाले, ६ कोटी ७० लक्ष निधीतून लासलगाव बसस्थानकाची पुनर्बांधणी लवकरच करण्यात येईल. सोळा गाव पाणी पुरवठा योजनेसाठी २१ कोटी रुपये निधी खर्च करून नूतनीकरण करण्यात आले आहे.

## नाशिक जिल्हा रुग्णालयात कर्मचाऱ्याचा मृत्यु

**नाशिक ।** येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात माळी काम करणाऱ्या कर्मचाऱ्याचा शनिवारी (ता.३) सकाळी मृत्यू झाल्याचे उघडकीस आले. एकनाथ त्र्यंबक गायकवाड (रा. लहवित) असे मयत कर्मचाऱ्याचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एकनाथ गायकवाड हे रुग्णालयात माळी काम करायचे. शनिवारी (ता. ३) सकाळी दहा वाजता ते नेहमीप्रमाणे कामावर आले होते. मात्र बराच वेळ झाला तरी ते त्यांच्या सोबतच्या सहकाऱ्यांना दिसले नाहीत. काही सहकाऱ्यांनी त्यांच्या मोबाईलवर संपर्कही साधला असता, ते उचलत नव्हते. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी त्यांचा शोध सुरू केला. त्यावेळी ते नवीन इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर ते गंभीर जखमी अवस्थेमध्ये पडलेले आढळून आले. त्यांच्या चेहऱ्यास व डोक्यास गंभीर दुखापत झालेली होती. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता त्यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकार्यांनी तपासून सांगितले.

### जाहीर नोटीस

**धुळे येथील में दिवाणी न्यायाधिश सोा स्तर यांच्या न्यायालयांत**

**दि.कि.अर्ज १८८/२०२४**

१ ) सुरेश चिंधु परदेशी उ.व.-६४ धंदा, सेवानिवत्त-शिक्षक
रा.मु.पो.कुसुंबा ता.जि.धुळे
२) मिराबाई किशनलाल परदेशी (लग्नांनंतरचे नाव)
मिराबाई चिंधु परदेशी (लग्नांपुर्वीचे नाव) उ.व.-७०, धंदा-घरकाम
रा. ४९० एल. टाईप . मामे गांधीनगर नं ८ तहसिल भानपुरा तहसिल जि. भानपुरा. मंडिसोर मध्यप्रदेश
३) मंदाबाई चिंधु परदेशी उ.व.-५९, धंदा-सेवानिवत्त शिक्षीका
रा. मु.पो. कुसुंबा ता.जि. धुळे
४ ) रमेश चिंधु परदेशी उ.व.-५७, धंदा-नोकरी
रा. मु.पो.शिव अर्पाटमेंट रूमं नं १०१ काळा तलाव निदान हॉस्पीटल च्या समोर कल्याण पश्चीम कल्याण ता.जि.ठाणे. **....अर्जदार**
**॥ विरुध्द ॥** **... सामनेवाला**
कै. चिधुं तानाजी परदेशी मुत्यु दि.०९/०१/२०२३
कै. उखडाबाई चिंधु परदेशी मुत्यु दि. १९/०४/२००८
सर्व मयत मु.पो. कुसुंबा ता. जि. धुळे **....मयत**

ज्या अर्थी अर्जदार यांनी उपरोक्त विषयांन्वये कळविण्यात येते की. कै चिंधु तानाजी परदेशी मुत्यु दि.९/१/२०२३ अर्जदार यांनी शासकीय व निमशासकीय व अनुकंपातत्वावर नोकरीकरीता तसेच खाजगी कामासाठी आवश्यक असल्याने तसेच अर्जदार नं १ ते ४ यांनी कै. चिंधु तानाजी परदेशी मयत याचे कायदेशीर वारस ठरवुन मिळण्याकामी दि. २९/१/२०२४ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे न्यायालयात पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौकशी दि.०७/०३/२०२४ निश्चीत केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस व हितचिंतक व संबधितांना वारस वैगरे संबधितांना कळविण्यात येते की याबाबत काही वाद उपस्थि त राहुन हरकत नोंदवावी. हरकत असल्यास सदर दिनांकापासुन में दिवाणी न्यायाधिश स्तर यांच्या कार्टात नं ३ कोर्टाच्या कामकाजात सहभागी होवुन हरकत नोंदवावी. अन्यथा कोणाचीही हरकत नाही असे समजुन कामकाज पुर्ण करण्यात येईल नोंद घ्यावी. नंतर येणारी तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण. धुळे
दि. १/२/२४ आदेशावरुन
(शिक्का)
**कामगिरी कारकुन** — **मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, धुळे**
**अधिक्षक** — **मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, धुळे**

**धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर साो. यांचे कोर्टात**

**दि.कि.अ.नं. १११/२०२४**

१. सीताराम रामचंद्र पाटील
२. सतीश सीताराम पाटील
३. सारीका सीताराम पाटील
४. इच्छाराम सीताराम पाटील सर्व रा.धाडरे, ता.जि.धुळे **....अर्जदार**
**॥ विरुध्द ॥**
**कोणीही नाही** **....जाबदेणार**

### जाहीर नोटीस

ज्याअर्थी अर्जदार क्र. १ ते ४ यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर सो. यांचे कोर्टात दिनांक १६/१/२०२४ रोजी दि कि. अर्ज नं. १११/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. वरील अर्ज अर्जदार यांनी मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अन्वये मयत सिंधूबाई सीताराम पाटील रा. धाडरे ता. जि.धुळे येथे दिनांक ३०/०७/२०२४ रोजी निधन झाले. त्यांचे वारस घोषीत होउन मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. कोर्टाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करता पुढील चौकशीची ता. २/३/२०२४ रोजी निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस हितचिंतक वगैरे संबंधीतांना कळविण्यात येथे की, याबाबत काही वाद असल्यास येथील ७ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर सो. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन तक्रार करावी. त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही तक्रार उपस्थित झाली नाही, तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे. कोर्टाचे सहिशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.
स्थळ:- धुळे
दिनांक : २९/०१/२०२४ आदेशावरुन
(शिक्का)
**क. लिपीक** — **दिवाणी न्यायालय, धुळे**
**अधिक्षक** — **दिवाणी न्यायालय, धुळे**

## केटीएचएम महाविद्यालयाला अर्थ डे ऑर्गनायझेशन, अमेरिकन संस्थेचा स्टार कॅम्पस अवॉर्ड

### शैक्षणिक, पर्यावरण, सामाजिक क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानाबद्दल सन्मान

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**




केटीएचएम महाविद्यालयाच्या मानांकनात अजून एक मानाचा तुरा रोवण्याचा दृष्टीने अर्थ दे ऑर्गनायझेशन, अमेरिका ह्या संस्थेमार्फत दिला जाणारा स्टार कॅम्पस २०२३ या अवॉर्डने महाविद्यालयाला गरविण्यात आले. अर्थ डे ऑर्गनायझेशन हि संस्था आंतराष्ट्रीय पातळीवर १९२ पेक्षा जास्त देशांमध्ये राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संघटनांसोबत तसेच शासकीय यंत्रणेसोबत आणि लाखो लोकांसोबत पर्यावरण संवर्धन, पर्यावरण जनजागृती, पर्यावरण शिक्षण, पृथ्वी वाचविण्यासंदर्भात अनेक उपक्रमांवर काम करत असते. महाविद्यालयाचे शैक्षणिक क्षेत्रातले योगदान आणि त्याच बरोबर महाविद्यालयाने विशेषत पर्यावरण आणि सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दाखल म्हणून महाविद्यालयाला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार वितरण समारंभ नुकताच के.टी. एच.एम. महाविद्यालयात पार पडला, सदर पुरस्कार वितरण समारंभासाठी अर्थ डे ऑर्गनायझेशन संस्थेच्या वतीने संस्थेचे भारतातील प्रतिनिधी श्री.विनायक साळोखे (असिस्टंट मॅनेजर, इंडिया ग्लोबल ऑफिस) हे महाविद्यालयात आले होते. सदर पारितोषिक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.डी.दरेकर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. सदर कार्यक्रमात श्री.विनायक साळोखे यांनी अर्थ डे. ऑर्गनायझेशन संस्थेच्या कार्याबद्दल माहिती सांगितली. महाविद्यालयास मिळालेल्या ह्या पुरस्काराबद्दल अभिनंदन केले. प्राचार्य डॉ.आर.डी.दरेकर यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणीक, पर्यावरणीय आणि सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल सविस्तर परिचय करून दिला. सदर पुरस्कार वितरण समारंभास महाविद्यालयाचे आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. एन.डी. गायकवाड, आय.क्यू.ए.सी. सचिव व पर्यावरण विभागप्रमुख डॉ. पी.एम.नलावडे, महाविद्यालयाचे सर्व उपप्राचार्य, सर्व विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते. प्रा.अश्रूती पवार यांनी समारंभाचे सूत्रसंचालन तर प्रा.के.डी.आहिरे यांनी समारंभाचे आयोजक म्हणून काम पाहिले. या पुरस्काराबद्दल मविप्र समाज संस्थेचे सरचिटणीस ड.नितीन ठाकरे यांच्या हस्ते प्राचार्य डॉ दरेकर यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वास मोरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर,उपसभापती देवराम मोगल, चिटणीस दिलीप दळवी तसेच सर्व संचालक मंडळ, शिक्षणाधिकारी डॉ.नितीन जाधव,डॉ अजित मोरे यांनी अभिनंदन केले आहे.

## न्यूज कॉलम

### वाहन अतिवेगाने चालविल्याने गुन्हा

**धुळे ।** मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर अवधान गावाच्या शिवारात मोहाडी पोलिसांनी सापळा लावला. धुळ्याकडून मालेगावकडे जाणाऱ्या रोडवरून दोन ट्रक अति वेगाने जात असल्याचे आढळून आले.

.......................................

### धुळे महापालिकेत दोन नवीन उपायुक्त

**धुळे ।** येथील महापालिकेत नवीन दोन उपायुक्तांची नेमणूक झाली आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ च्या अनुषंगाने राज्य शासनाकडून सध्या अधिकाऱ्यांच्या बदल्यांची प्रक्रिया सुरू आहे. नगरविकास विभागानेही महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील मुख्याधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्या व पदस्थाना केल्या आहेत. यात चोपडा (जि. जळगाव) नगर परिषदेचे मुख्याधिकारी हेमंत निकम व पाचोरा (जि. जळगाव) नगर परिषदेच्या मुख्याधिकारी शोभा बाविस्कर यांची धुळे महापालिकेत उपायुक्तपदी पदस्थापना करण्यात आली.

.......................................

### दोघांना मारहाण; चौघांवर गुन्हा दाखल

**धुळे ।** धक्का लागला म्हणून काका-पुतण्यास मारहाण केल्याप्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल झाला. राजेश गुलाब बहिरम (रा. मोहगावपैकी वडपाडा, ता. साक्री) हा त्याच्या काकांसह ३१ जानेवारीला रात्री गावातील सोन्या चौधरी याला दिलेली दुचाकीचा तपास करण्यासाठी त्याच्या घरी गेला. परत येताना सोमा काळू पवार याला काकांचा धक्का लागला. त्याचा राग येऊन रौलेश काळू पवार याच्या जावायाने प्लास्टिकच्या पाईपने राजेश याला पायावर मारून जखमी केले.

# नेटबॉलमध्ये धुळे विभागाच्या पुरुष व महिला संघांना विजेतेपद

### उपविजेतेपद एरंडोल तर जळगाव व नंदुरबार तृतीय स्थानी

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव अंतर्गत पुरुष व महिला खेळाडूंच्या विभागीय नेटबॉल क्रीडा स्पर्धा धुळे तालुक्यातील नगाव येथील गंगामाई इंजिनिअरींग कॉलेजच्या मैदानावर नुकत्याच संपन्न झाल्या. स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे यांच्या हस्ते मैदानावर श्रीफळ फोडून करण्यात आले.

यावेळी प्राचार्य एस व्ही चोरडिया, प्राचार्य व्ही एम पाटील, एल एन गिरासे, नगेश पाटील, उपप्राचार्य गोविंद पोतदार, निवड समिती सदस्य प्रा. संजय भावसार ( एरंडोल), प्रा. राजेश सोनवणे (नंदुरबार), धुळे विभाग क्रीडा समिती सचिव प्रा.डॉ. नितीन वाळके, प्रा. नरेश बागल (धुळे), जिल्हा हौशी नेटबॉल असोसिएशनचे सचिव योगेश वाघ, राष्ट्रीय सुवर्णपदक विजेते खो-खो खेळाडू अविनाश वाघ, चारही संघांचे व्यवस्थापक प्रा.डॉ. अरविंद कांबळे, प्रा. हर्ष सरदार, प्रा. अमर हटकर, प्रा. एस. व्ही तागड, प्रा. शरतान चौधरी, हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. स्पर्धेत धुळ्याच्या पुरुष संघाने नंदुरबार (६१-००),एरंडोल ( २५-०७), जळगाव (४४-००), तर महिला संघाने नंदुरबार (१३-०० ),एरंडोल (२४-०३), जळगाव (४२-००) गुणांनी एकतर्फी हरवीत विजेतेपदाची परंपरा कायम राखली. विजेत्यासंघाचे प्रतिनिधित्व ऋत्विक ठाकूर, मयुरी जाधव यांनी केले स्पर्धेत एकुण आठ संघ सहभागी झाले होते. उपविजेपद एरंडोल तर तृतीय क्रमांकाचे विजेतेपद जळगाव व नंदुरबार विभागाने पटकवले. विद्यापीठाचे क्रीडा संचालक प्रा. डॉ. दिनेश पाटील यांनी विजेत्या संघांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. स्पर्धा यशस्वीतेसाठी स्पर्धा आयोजन समिती सदस्य प्रा.शरतान चौधरी सर यांच्या मार्गदर्शनाने महाविद्यालयाचे प्रा. दुर्गेश खैरनार, प्रा. बेडसे, प्रा. स्नेहा पवार, प्रा. पाटील, प्रा. तेजश्री बोरसे, श्री सारंग पाटील,प्रा. योगेश्र्वरी कोलापकर यांनी परिश्रम घेतले जिल्हा हौशी नेटबॉलचे निलेश चौधरी, हर्षल भदाणे, सोनिया गावडे, राजू साव, सनी जाधव, सचिन उचाळे व भविष्य वाघ यांनी पंच म्हणून काम सांभाळले. सुत्रसंचलन प्रा. जी एम इंदाईत यांनी केले.

# खा.डॉ.भामरेंच्या पाठपुराव्यामुळे भागणार निमडाळेकरांची तहान

### अक्कलपाडा प्रकल्पातून डाव्या कालव्याद्वारे तलाव भरण्यासाठी आवर्तन

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



### निमडाळेकरांनी मानले खासदारांचे आभार

**निमडाळे येथील पाणीटंचाईच्या मुद्द्यावर खासदार डॉ. सुभाष भामरे यांनी जिल्हाधिकाऱ्यांसह पाटबंधारे व जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांची चार वेळा बैठक घेत निमडाळे येथील शिपाई तलाव भरून घेण्यासाठी सतत पाठपुरावा केला. त्यांच्या या पाठपुराव्यामुळेच निमडाळे येथील ग्रामस्थांना उन्हाळ्यात पिण्यासाठी पाणी मिळणार असल्याने ग्रामस्थांनी तसेच ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी खासदार डॉ. भामरे यांचे आभार मानले आहेत.**

### जिल्हाधिकाऱ्यांचे आवर्तन सोडण्याचे निर्देश

**या सूचनांनुसार पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी सर्वेक्षण करत येणाऱ्या अडचणी दूर केल्या. तसा अहवाल त्यांनी जिल्हाधिकारी व खासदार डॉ. भामरे यांना दिला. त्यानुसार जिल्हाधिकारी गोयल यांनी अक्कलपाडा प्रकल्पातून डाव्या कालव्याद्वारे निमडाळे येथील शिपाई तलाव भरण्यासाठी आवर्तन सोडण्याची निर्देश पाटबंधारे विभागाला दिले. त्यानुसार बुधवारी (ता. ३१) अक्कलपाडा प्रकल्पाच्या डाव्या कालव्यातून आवर्तन सोडण्यात आले असून, ते उद्या (ता. २) सायंकाळपर्यंत निमडाळे येथील शिपाई तलावात पोहोचण्याची शक्यता आहे. दरम्यान, भाजपचे उद्योग आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष उत्कर्ष रवंदळे-पाटील, भाजपचे तालुकाध्यक्ष देवेंद्र पाटील, पक्षाचे तालुका सरचिटणीस शरद पाटील, निमडाळेचे सरपंच सुधाकर सैंदाणे आदींनी बुधवारी कालव्यातून सोडलेल्या पाण्याची पाहणी केली.**

दर वर्षी उन्हाळ्यात पाणीटंचाईच्या झळा सहन करणाऱ्या निमडाळे (ता. धुळे) येथील ग्रामस्थांचा यंदाचा उन्हाळा मात्र दिलासादायक जाणार आहे. यासाठी खासदार डॉ. सुभाष भामरे यांचा सततचा पाठपुरावा महत्त्वाचा ठरला आहे. जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी अक्कलपाडा प्रकल्पाच्या डाव्या कालव्याद्वारे निमडाळे येथील तलाव भरण्यासाठी आवर्तन सोडण्याचे निर्देश दिल्यानंतर तशी कार्यवाही झाली असून, येत्या दोन दिवसांत हे पाणी निमडाळे येथील शिपाई तलावात पोहोचून निमडाळेकरांना पिण्यासाठी पाणी मिळणार आहे. यामुळे ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्र्वास सोडला आहे.

यंदा कमी पर्जन्यमानाच्या पार्श्र्वभूमीवर निमडाळे येथील ग्रामस्थांना गेल्या तीन महिन्यांपासून पाणीटंचाईचा सामना करावा लागत होता. तेथील ग्रामस्थांना चक्क २० ते २५ दिवसांनंतर पाणी मिळत होते. कमी पावसाअभावी दर वर्षीच निमडाळेकरांवर ही परिस्थिती ओढवत होती. याबाबत निमडाळेचे सरपंच सुधाकर सैंदाणे, उपसरपंच नितीन सूर्यवंशी, भाजपचे तालुका सरचिटणीस शरद पाटील आणि ग्रामस्थांनी खासदार डॉ. सुभाष भामरे यांच्याकडे पाणीटंचाईबाबत कैफियत मांडली. त्याची तीव्र दखल घेत खासदार डॉ. भामरे यांच्या सूचनेनुसार जिल्हाधिकाऱ्यांसह पाटबंधारे व जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांची चार वेळा बैठक झाली. गेल्या सहा जानेवारीला जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्यासह पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक झाली.



# भोरखेडा पटेल विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन साजरा

**वरुळ । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

आर सी पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय भोरखेडा ता शिरपूर जि धुळे येथे वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन प्राचार्य आर एफ शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्ष धुळे जिल्हा परिषदेच्या सदस्य बेबीबाई फुटलाल पावरा या होत्या तर स्नेहसंमेलनाचे उद्घाटन पोलीस उपनिरीक्षक मोनिया निलेशसिंग राजपूत यांनी सरस्वती पूजन केले तर दीपप्रज्वलन प्रमुख पाहुणे शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारी अधिकारी डॉ उमेशजी शर्मा यांनी केले.

यावेळी भोरखेडा ग्रामपंचायत सरपंच विठाबाई शामराव ठाकरे,तोंदे ग्रामपंचायत सरपंच राहुल रुपसिंग चौधरी,असली ग्रामपंचायतचे उपसरपंच रुपाली सुनिल कोळी,माजी सरपंच उखडू गुलाब कोळी,प्राचार्य दिनेश राणा,मुख्याध्यापक पी एन गोसावी, ईश्र्वर पाटील,शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष रघुनाथ भिलेसिंग जमादार, सचिन राजपूत, नारायणसिंग राजपूत, सुरेंद्र राजपूत उपस्थित होते मान्यवरांचे स्वागत प्राचार्य आर एफ शिरसाठ, पर्यवेक्षक सी जी पाटील, मिना पटेल यांनी केले. प्रास्ताविक पर्यवेक्षक सी जी पाटील यांनी केले. स्नेहसंमेलनात २८१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यासाठी परीक्षक म्हणून सोनाली पाटील,सुमित जाधव,विकास राजपूत यांनी परीक्षण केले.प्रथम क्रमांक छत्रपती शिवराय शौर्य गाथा,द्वितीय क्रमांक मिलिटरी नृत्य, तृतीय क्रमांक केसरी के लाल या नृत्यांना मिळाला.

# देवरे अभियांत्रिकीत संस्थात्मक जाणीव या विषयावर परिसंवाद संपन्न: भटकर यांचे ऑनलाईन मार्गदर्शन

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजी राव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयात ईलेक्ट्रॉनिक्स विभागातर्फे प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांचे साठी संस्थात्मक जाणीव या विषयावर परिसंवाद नुकताच आयोजित करण्यात आला होता. पद्मश्री, पद्मभूषण व महाराष्ट्र भूषण परम संगणक निर्माते डॉ विजय भटकर यांनी या परिसंवादात ऑनलाईन मार्गदर्शन केले. तसेच जेष्ठ उद्योजक विचारवंत व महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी महेश लोहार यांनी परिसंवादात उपस्थित राहून बहुमोल मार्गदर्शन केले.

डॉ विजय भटकर यांनी या परिसंवादात ऑनलाईन मार्गदर्शन करताना स्वयं जागरुकता वृध्दींगत करणे, विचार व आकलन क्षमता विकसित करणे, नेतृत्व गुण वाढवणे, परस्परांमधील सहकार्य वाढवणे, नवनिर्मिती ला प्रोत्साहन देणे आदी विषयांवर महत्वपूर्ण मार्गदर्शन केले व भविष्यात लवकरच देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयात भेट देण्याबाबत आश्र्वस्त केले. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व योग प्रशिक्षक विचारवंत महेश लोहार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सकारात्मक विचार शैली अंगिकारुन व्यक्त होणे, जीवनात आनंदी रहाणे, कमतरतांवर मात करुन उद्दीष्टांवर लक्ष केंद्रित करणे, विषमतेतून समता व समतेतून विषमता, प्रज्ञा प्रबुद्ध विज्ञान, आयम आत्मा ब्रह्मा यावर मार्गदर्शन केले तसेच वेदना शक्ती, स्मृतीशक्ती, भावना शक्ती, मनिषा शक्ती, धारणा शक्ती, इच्छा शक्ती, संतोष शक्ती या मानवी मनाच्या विविध अवस्था व शक्ती यावर विस्तृत विवेचन केले. तसेच स्वतः च्या जीवनासाठी आदर्श रोडमॅप ठरवून त्यावर मार्गक्रमण करावे असे आवाहन केले. श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा आ बाबा साहेब कुणाल, महाविद्यालयाचे अध्यक्ष मा दादासाहेब सुभाष देवरे, उद्योजक विलास देवरे, प्राचार्य डॉ हितेंद्र पाटील यांच्या प्रमुख मार्गदर्शनात ईलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख प्रा विनोद शिंदे, प्रा डॉ सागर मोरे यांनी विभागातील सहकारी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांच्या सह संयोजन केले. विभागातील जेष्ठ प्राध्यापिका प्रा सौ संगीता राजपूत यांनी प्रास्ताविक, सूत्रसंचालन केले व प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्राचार्य डॉ हितेंद्र पाटील यांनी महेश लोहार यांचे स्वागत केले व सत्कार केला. या प्रसंगी विभाग प्रमुख प्रा डॉ एस डी सूर्यवंशी, प्रा डॉ पी एस पाटील, प्रा डॉ भालचंद्र मांडरे, प्रा डॉ ए आर मोरे, प्रा संगीता अग्रवाल तसेच प्रा डॉ पी एस देसले, विविध विभागातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते.

### दीड लाखाचा मुद्देमाल भाडणे शिवारात लंपास

**धुळे ।** भाडणे (ता. साक्री) शिवारातील शेतातून चोरट्यांनी २५ क्विंटल कापसासह इलेक्ट्रिक मोटार, असा सुमारे दीड लाखाचा मुद्देमाल लंपास केला. संजय रामा थोरात (रा. अंबापूर, ता. साक्री) यांच्या तक्रारीनुसार त्यांच्या गावशिवारातील शेतामधील कांद्यांच्या चाळीतून चोरट्यांनी एक लाख २५ हजारांची २५ क्विंटल कपाशी व १५ हजारांची पाच वीजमोटार लंपास केली. चोरीची ही घटना ३१ जानेवारी ते १ फेब्रुवारीदरम्यान घडली.

# अपंग जनता दलाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी लक्ष्मण राठोड

**होळनांथे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**




अपंग बांधवांच्या न्याय व हक्कासाठी लढणाऱ्या अपंग जनता दल या सामाजिक संघटनेच्या धुळे जिल्हा उपाध्यक्षपदी पिंपळे पुनर्वसन येथील लक्ष्मण छगन राठोड यांची निवड करण्यात आली असून त्यांच्या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

अपंगांवर होत असलेले अन्याय, अत्याचाराच्या विरोधात लढा देण्याकरीता अपंग जनता दल हया सामाजिक संघटनेचे राज्यभरात कार्य असून याच संघटनेचे ध्येय धोरणानुसार अपंगांना न्याय मिळवून देण्यासाठी लक्ष्मण राठोड यांची धुळे जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शेख अनिस यांच्या आदेशान्वये चाळीसगाव येथे झालेल्या संघटनेच्या मेळाव्यात, संघटनेचे राज्य उपाध्यक्ष लक्ष्मण वाघे यांनी लक्ष्मण राठोड यांची नियुक्ती केली आहे. यावेळी संघटनेचे राज्यअध्यक्ष बाळासाहेब लांडे, राज्यकार्याध्यक्ष जाकीरशेख, राज्यसंपर्कप्रमुख भाऊसाहेब दशपुते, धुळे जिल्हाध्यक्ष राजकुमार पाटील, जळगाव जिल्हा महिलाअध्यक्षा श्रीमती दिपाली पाटील, जळगाव जिल्हाअध्यक्ष देवेश पवार, जिल्हा महिलाउपाध्यक्षा माधुरी कवारे, महिला महासचिव सरला लुल्ले, जिल्हा सचिव निलेश पाटील, महासचिव बी. एस. ठाकूर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# छावा जनक्रांती संघटना महाराष्ट्रतर्फे जैन गुरुकुल वसतिगृहात खाऊ वाटप

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

छावा जनक्रांती संघटना महाराष्ट्रचे संस्थापक अध्यक्ष, समाजसेवक तथा उद्योजक शरद पवार यांचा हस्ते जैन गुरुकुल वसतिगृह येथे खाऊ वाटप करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाची सुरुवात पसायदानने करण्यात आली.

छावा जनक्रांती संघटना महाराष्ट्रतर्फे नाशिक येथे जैन गुरुकुल वसतिगृह येथे भेट देऊन विविध प्रकारच्या समस्यांची माहिती घेण्यात आली. छावा जनक्रांती संघटना महाराष्ट्रतर्फे सर्व प्रकारचे प्रश्र्न, समस्या सोडवण्यास मदत व सहकार्य केले जाईल, असे आश्र्वासन छावा जनक्रांती संघटना महाराष्ट्रतर्फे देण्यात आला. तसेच संघटनेतर्फे सर्व प्रकारची मदत व सहकार्य मोफत केले जात आहेत. सेवा ही मोफत केली जाते. पैसे घेऊन जी व्यक्ती, संस्था व संघटना काम करते, समाजसेवेसाठी पैसे घेतो तो दलाल असतो, असं छावा जनक्रांती संघटना महाराष्ट्रतर्फे सांगण्यात आले. प्रसंगी छावा जनक्रांती संघटना महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष शरद पवार यांनी सर्व अनाथ मुलांना आपल्या जीवनातील मनाचा ताबा, मनाची एकाग्रता, स्थिर मन, अस्थिर मन, चंचल मन, अंर्तमन, उत्साह, जिद्द, चिकाटी, धाडस, ध्येय व करियरवर सखोल आणि सविस्तर मुद्दे मांडत मार्गदर्शन केले.



# निरंकारी संत समागममध्ये दिव्य युगुलाच्या पावन सान्निध्यात पंचेचाळीस जोडपी विवाहबद्ध

**सिडको । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

निरंकारी सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज व निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन सान्निध्यात आयोजित केलेल्या ५७ व्या वार्षिक निरंकारी संत समागमाच्या जागेवर एकंदर ४५ जोडपी विवाहबद्ध झाली. नव विवाहित वधूवरांना सदगुरु माताजींनी गृहस्थ जीवन भक्ति करत व्यतीत करण्यासाठी आशीर्वाद प्रदान केला. तसेच निरंकारी पद्धतीने साधे विवाह करण्याची निवड केल्याबद्दल त्यांच्या कुटुंबियांचे अभिनंदन केले.

या सामूहिक विवाह कार्यक्रमात वधूवरांनी पारंपारिक जयमाला (वरमाला) एकमेकांच्या गळ्यात घातल्या. याशिवाय निरंकारी विवाहाचे विशेष चिन्ह सामायिक हार निरंकारी मिशनच्या प्रतिनिधींनी प्रत्येक जोडप्याला परिधान केले. लांवांच्या (मंगलाष्टका) दरम्यान सद्गुरु माताजी व राजपिताजी यांनी वधूवरांवर पुष्पवर्षाव करुन आपला आशीर्वाद प्रदान केला. त्याचप्रमाणे वधूवरांच्या कुटुंबियांनीही त्यांच्यावर पुष्पवर्षाव केला. हे दृश्य खरोखरच अलौकिक होते. कालच्या या शुभ प्रसंगी महाराष्ट्रासह इतर राज्यांतून एकंदर ४५ जोडपी विवाहबद्ध झाली. त्यामध्ये मुंबई, अकोला, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा, चंद्रपुर, चिपळूण (रत्नागिरी), धुळे, डोंबिवली, गडचिरोली, जालना, कोल्हापुर, नागपुर, पालघर, पुणे सोलापुर, ठाणे, वर्धा आणि वाशिम या जिल्ह्यांसह मध्य प्रदेश, गुजरात, राजस्थान व उत्तर प्रदेश या राज्यांतील वधूवरांचा समावेश होता. नि:संदेह साध्या विवाहांचे हे अलौकिक दृश्य जाती, वर्ण इत्यादिंची विषमता दूर करुन एकत्वाचा सुंदर संदेश प्रस्तुत करत होते जो निरंकारी मिशनचा संदेश देखील आहे.

# आयमावर अखेर एकता पॅनलचाच झेंडा

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (आयमा) च्या निवडणुकीत एकता पॅनलच्या सर्व उमेदवारांनी मोठ्या फरकाने विजय मिळवल्याने औद्योगिक गोटात आनंदाचे वातावरण पसरले आहे. निमा आणि आयमावर आता एकाच विचारांचे पदाधिकारी निवडून आल्याने आता जिल्ह्यातील औद्योगिक विकासाला तसेच मोठ्या गुंतवणुकीचे प्रकल्प आणण्याला अधिक चालना मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

या निवडणुकीसाठी एकता पॅनलने आपल्या उमेदवारांची घोषणा केल्यानंतर विरोधकांचे अवसान गळाले आणि त्यांनी नांगी टाकून निवडणूक बिनविरोध करण्याचे आश्र्वासन दिले. त्यानुसार प्रयत्न सुरू असतानाच विरोधकांनी छुप्यारीतीने प्रयत्न करून अनिल आमले यांच्या रूपाने उमेदवार उभा करून निवडणूक लादलीच. त्यामुळे निवडणूकही खर्चिक झाली. आमले यांनी वेळीच माघार घेतली असती तर निवडणूक बिनविरोध होऊन निवडणुकीवर झालेला खर्चही वाचला असता असे अनेक उद्योजकांनी बोलून दाखवले.अध्यक्षपदासाठी ललित बूब, उपाध्यक्ष राजेंद्र पानसरे, सचिव प्रमोद वाघ, सहसचिव हर्षद बेळे व योगिता आहेर तर कोषाध्यक्षपदी गोविंद झा यांची आधीच बिनविरोध निवड झाली होती. तर कार्यकारी मंडळाच्या २५ जागांसाठी २६ उमेदवार रिंगणात असल्याने ३० जानेवारीला निवडणूक झाली. २१४६ पैकी सुमारे ४२ टक्के म्हणजे ८९८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. २६ मते बाद झाली. ३१ जानेवारीला तीन तासात मतमोजणी पूर्ण होऊन त्यात एकता पॅनलचे सर्व २५ उमेदवार निवडून आले. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून विवेक गोगटे यांनी काम बघितले. त्यांना सतीश कोठारी आणि एस.टी.गाजरे यांनी सहकार्य केले.विजयी उमेदवार पुढील प्रमाणे. कंसातील आकडे त्यांना पडलेली मते दर्शवितात जितेंद्र आहेर (८०१), जयदीप अलीमचंदानी (७९५), सुमित बजाज (७९१), अविनाश बोडके (७९९), श्र्वेता चांडक (८००), कुंदन डरंगे (७९७), विराज गडकरी (७९२), राहुल गांगुर्डे (७९२), हेमंत खोंड (७९७), उमेश कोठावदे (८०४), विनोद कुंभार (७९८), रवींद्र महादेवकर (८०४), अविनाश मराठे (८०२), जयंत पगार (७९६), श्रीलाल पांडे (७८०), जगदीश पाटील (७९७), करणसिंग पाटील (७९०), मनीष रावळ (८०५), रवी शामदासानी (८०१), धीरज वडनेरे (७९१), डी.बी.विभुते (७८९), अभिषेक व्यास (७८१), दिलीप वाघ (८०१), अजय यादव (७६८), रवींद्र झोपे ( ७७५).एकता पॅनलच्या सर्व उमेदवारांना निवडून आणण्यात निमाचे अध्यक्ष आणि या पॅनलचे नेते धनंजय बेळे, आयमाचे माजी अध्यक्ष विजय तलवार, जे.एम. पवार, मावळते अध्यक्ष निखिल पांचाळ, माजी अध्यक्ष ज्ञानेश्र्वर गोपाळे, वरूण तलवार आदींनी विशेष परिश्रम घेतले.



# धुळयात आयोजित एकांकिका स्पर्धेला तरूणाईने दिला जोरदार प्रतिसाद

## कलाकारांसह धुळेकर नागरिकांमध्ये निकालाची उत्सुकता





















धुळे

। धुळे शहरात अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने आयोजित शंभरावे नाट्य संमेलनाच्या निमित्ताने महाराष्ट्रभर नाट्यकलेचा जागर सुरु आहे. त्या अंतर्गत पत्रकार भवनात शनिवारी एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सकाळी स्पर्धेचे उदघाटन जेष्ठ कलावंत दिलीप दळवी, जेष्ठ कलावंत डॉ. अनिल बांदिवडेकर, जेष्ठ कलावंत विलास पगार, धुळे शाखेचे अध्यक्ष सुनिल नेरकर, मुंबई नियामक मंडळ सदस्य चंद्रशेखर पाटील, धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष रवींद्र इंगळे, धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सचिव सचिन बागुल, सुजय भालेराव यांच्या हस्ते करण्यात आले. ८ एकांकिकांना सादर करण्यात आले. तरूणाईने जोरदार प्रतिसाद दिला. परीक्षक जेष्ठ कलावंत डॉ. अनिल बांदिवडेकर यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले कि, प्रशांत दामले यांच्या संकल्पनेतून कला हि गावागावात जोपासली जावी म्हणून स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. जी एकांकिका परीक्षकांना थकवते ती प्रेक्षकांना आवडते ती उपांत्य फेरीत जाते. तुम्ही सर्व कलाकार एक दिलाने काम करा असे देखील सांगितले.

CMYK

दैनिक

# लक्ष महाराष्ट्र

धुळे-नंदुरबार-नाशिक

रविवार दि. ४ फेब्रुवारी २०२४






# नाट्यकलेचा जागर या संकल्पनेतून गावगावात कला जोपासण्याचा प्रयत्न

## जेष्ठ कलावंत डॉ. अनिल बांदिवडेकर यांचे प्रतिपादन




















धुळे। धुळे शहरात अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने आयोजित शंभरावे नाट्य संमेलनाच्या निमित्तानिमित्ताने महाराष्ट्रभर नाट्यकलेचा जागर सुरु आहे. त्या अंतर्गत पत्रकार भवनात शनिवारी एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत विविध विषयावर एकांकिका कलावंतांनी विविध विषयावर सादर केल्या. स्पर्धकांनी एकांकिकेचा विषय, विषयाचे गांभीर्य आणि लेखन कौशल्य तसेच दिग्दर्शकाचे सादरीकरणाबाबतचे स्पष्टीकरण दिग्दर्शक यावेळी मांडले. तसेच परीक्षकांनी देखील स्पर्धकांना मार्गदर्शन केले. स्वलिखित मुक्त विषयावर किंवा नावाजलेल्या लेखकांची संहिता घेऊन एकांकिका या स्पर्धेत दिसून आल्या. स्पर्धकांनी विविध विषयांना देखील हात घातल्याचे दिसून आले.

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com | RNI No.MAHMAR/2019/79184

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ९० वा ▶ रविवार दि.४ फेब्रुवारी २०२४ ▶ किंमत :२ रु. ▶ पृष्ठे : ६

खुशखबर... खुशखबर...
खास लोकांच्या आग्रहास्तव
न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स, धुळे
पार्सल सेवा व रिटर्न बुकींग उपलब्ध
धुळे ते नागपुर, अमरावती, अकोला
स्लिपर कोच २x१ नॉन एसी बस
रात्री १०.३० वाजेला

संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

# धुळ्यातील कलावंतांमध्ये मोठे होण्याची प्रचंड क्षमता : डॉ. अनिल बांदिवडेकर

## धुळ्यातील एकांकिकांनी जिंकली परिक्षकांची मने

**धुळे । पुरुषोत्तम पाटील**

धुळे शहरात अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने आयोजित शंभरावे नाट्य संमेलनाच्या निमित्ताने महाराष्ट्रभर नाट्यकलेचा जागर सुरु आहे. त्या अंतर्गत पत्रकार भवनात शनिवारी एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

सकाळी स्पर्धेचे उदघाटन जेष्ठ कलावंत दिलीप दळवी, जेष्ठ कलावंत डॉ. अनिल बांदिवडेकर, जेष्ठ कलावंत विलास पगार, धुळे शाखेचे अध्यक्ष सुनिल नेरकर, मुंबई नियामक मंडळ सदस्य चंद्रशेखर पाटील, धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष रवींद्र इंगळे, धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सचिव सचिन बागुल, सुजय भालेराव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ७ एकांकिकांना सादर करण्यात आले. तरूणाईने जोरदार प्रतिसाद दिला. परीक्षक जेष्ठ कलावंत डॉ. अनिल बांदिवडेकर यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले कि, प्रशांत दामले यांच्या संकल्पनेतून कला हि गावागावात जोपासली जावी म्हणून स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. जी एकांकिका परीक्षकांना थकवते ती प्रेक्षकांना आवडते ती पुढच्या फेरीत जाते. तुम्ही सर्व कलाकार एक दिलाने काम करा असे देखील सांगितले.

परीक्षक जेष्ठ कलावंत दिलीप दळवी यांनी सांगितले कि धुळ्यात एवढी चांगली स्पर्धा होईल हे वाटले नव्हते. तसेच धुळ्यात आता चंद्रशेखर पाटील यांनी काम केले आहे असे देखील वाटत आहे. धुळ्यातील एवढा मोठा माणूस मुंबईत आहे. असे म्हणत चंद्रशेखर पाटील यांचे कौतुक देखील केले. अभिनय बरोबर जे स्टेज मागे काम करतात ते देखील खुप मोठे असतात. मी देखील एकांकिका स्पर्धांमधून मोठा झालो आहे. धुळेकरांनी या स्पर्धाना एवढा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला त्याबद्दल त्यांनी धुळेकरांचे आभार देखील व्यक्त केले. मुंबई नियामक मंडळ सदस्य चंद्रशेखर पाटील यांनी सांगितले कि, आज खऱ्या अर्थाने नाट्य परिषदेचा उद्देश पूर्ण झाला. अजुन मोठ्या प्रमाणात धुळ्यात कलाकार तयार झाला पाहिजे असा देखील नाट्य परिषदेचा प्रयत्न आहे. असे देखील मुंबई नियामक मंडळ सदस्य चंद्रशेखर पाटील यांनी सांगितले. धुळे शाखेचे अध्यक्ष सुनिल नेरकर यांनी सांगितले कि,आमच्या मुलांना चांगले व्यसपीठ मिळाले तर आमचे मूल देखील तुम्हाला मुंबईत दिसतील. तसेच लवकरच धुळ्यातील कळकरांसाठी कार्यशाळेचे आयोजन करू असे देखील त्यांनी सांगितले. गुणवत्ता प्रमाण पत्र परीक्षक जेष्ठ कलावंत विलास पगार यांनी जाहीर केले. तसेच कलाकारांचे कौतुक देखील केले.





### उत्सुकता निकालाची

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने धुळ्यात एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सादर झालेल्या दर्जेदार एकांकिकांमुळे स्पर्धकांसह प्रेक्षकांना निकालाची उत्सुकता लागली आहे. आज निकाल जाहीर करण्यात येईल असे देखील सांगितले. त्यामुळे कलाकारांसह धुळेकर नागरिकांना निकालाची उत्सुकता लागली आहे.

### गुणवत्ता प्रमाणपत्र जाहीर

यामध्ये स्वराज सावेत, राहुल मंगळे, मिहिर पाटील, ओम कासार, कुणाल खैरनार,सिद्धार्थ मंगळे, धनश्री कारभारी, जोती मंगळे,हर्षदा शिरसाट धृवाक्षी क्षीरसागर, प्रमोदिनी पाटील, राधिका नेरकर यान जाहीर झाला.











# मंत्रालयात बैठक घेवून विनोद वाईन्सचा निकाल लावणार : आ.फारुख शाह

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

धुळे शहरातील मध्यवर्ती भागातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या मागे असलेले विनोद वाईन्स हे विदेशी मद्याचे दुकान बंद करण्यात यावे यासाठी आझाद समाज पार्टीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.आ.फारुख शाह यांनी उपोषणकर्ते आनंद लोंढे,भैय्यासाहेब वाघ आणि कार्यकर्त्यांची भेट घेतली व येत्या आठवड्यात मंत्रालयात राज्य उत्पादन शुल्क मंत्री ना.शंभुराज देसाई यांच्या दालनात उच्चस्तरीय बैठक घेवून विनोद वाईन्सचा कायम स्वरुपी निकाल लावणार असल्याचे प्रतिपादन आ.फारुख शाह यांनी केले.

आझाद समाज पार्टीच्या वतीने गेल्या दोन महिन्यांपासून धुळे शहरातील मध्यवर्ती भागातील



डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या मागे असलेले विनोद वाईन्स हे विदेशी मद्याचे दुकान हटवावे यासाठी आंदोलन करण्यात येत आहे. दि.१ फेब्रुवारी पासून आनंद लोंढे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येत आहे. आज रोजी उपोषणस्थळी आ.फारुख शाह यांनी भेट देवून उपोषणकर्त्या कार्यकर्त्यांना पाठिंबा दिला.यावेळी राज चव्हाण,सतिष अमृतसागर,हारूण खाटीक,आसिफ शाह आदी उपस्थित होते.

# वाहतूक नियमांचे पालन करत चालकांनी व्यसनापासून दूर रहावे : राकेश हांडे

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

रस्ते अपघात टाळण्यासाठी चालकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे. विशेषत: व्यसनापासून पूर्णपणे दूर रहावे असे आवाहन आडगाव वाहतूक विभागाचे पोलीस निरिक्षक राकेश हांडे यांनी चालकांना केले आहे. नाशिक जिल्हा ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रक टर्मिनल, आडगाव येथे राष्ट्रीय रस्ता सुरक्षा वाहतूक अभियान २०२४ अंतर्गत वाहतूक सुरक्षा शिबिर व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.



नाशिक शहर वाहतूक पोलीस व परिवहन विभाग नाशिक यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमास आरटीओ प्रविण सोनवणे, वाहतूक नियमांचे शाळा कॉलेजमध्ये धडे देणारे पोलीस सचिन जाधव, नाशिक ट्रान्सपोर्टचे अध्यक्ष राजेंद्र फड, कार्याध्यक्ष पी.एम.सैनी, माजी अध्यक्ष जयपाल शर्मा आदी उपस्थित होते.

# मंत्री छगन भुजबळ यांच्या उपस्थितीत अहमदनगरमध्ये उसळला ओबीसींचा जनसागर

### खोटे दाखले दिले तर ओबीसी आरक्षण संपुष्टात येईल : मंत्री छगन भुजबळ

**अहमदनगर । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

आपल्याला आमदारकी, मंत्री पदाची कुठलीही फिकीर नसून ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी आपण शेवटपर्यंत लढणार आहोत. त्यामुळे कुठल्याही दबावाला बळी न पडता संपूर्ण ओबीसी समाजाने एकत्र येऊन लढलं पाहिजे असे आवाहन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

ओबीसी भटके विमुक्त आरक्षण बचाव एल्गार मेळावा काल अहमदनगर येथे पार पडला. यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री आ.महादेव जानकर, आमदार गोपीचंद पडळकर, माजी




आमदार प्रकाश शेंडगे, मुस्लिम ओबीसी संघटनेचे शब्बीर अन्सारी, प्रा.लक्ष्मण हाके, सत्संग मुंडे, प्रा.पी. टी. चव्हाण, पांडुरंग अभंग, कल्याण दळे, शंकरराव लिंगे, दौलतराव शितोळे, डॉ.सुदर्शन घेरडे, डॉ.स्नेहा सोनकाटे, जे.डी.तांडेल, आंधळे महाराज, मिननाथ पांडे, अरुण खरमाटे, अभय आगरकर, अनिल निकम, डॉ. नागेश गवळी, विशाल वालकर, भगवान फुलसुंदर, अंबादास गारुडकर यांच्यासह ओबीसी भटके विमुक्त समाजातील बांधव बहुसंख्येने उपस्थित होते.

# तोतया जीएसटी अधिकारी टोळीतील बबल्याला अटक

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

बेडरपणे लाल दिव्याचे वाहन उपयोगात आणून मुंबई-आग्रा महामार्गावर तोतया जीएसटी अधिकारी बनून पैसे लुटणाऱ्या टोळीतील चौथा संशयित विनय सुरेश बागूल उर्फ बबल्या (रा. पिंजारी चाळ, रेल्वे स्टेशन भाग, धुळे) यास पोलिसांनी शुक्रवारी अटक केली.

पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी या गंभीर प्रकरणाचा तपास पारदर्शकतेने होण्यासाठी पोलिस उपअधीक्षक हृषिकेश रेड्डी यांच्याकडे सोपविला आहे. पोलिस अधीक्षक धिवरे यांनी सुरवातीपासून या गंभीर घटनेचा पारदर्शकतेने तपास करून उलगडा करण्याचे ठाणले. त्यास यश मिळाले.तत्कालीन एका बड्या पोलिस अधिकाऱ्याच्या आशीर्वादाने तोतया जीएसटी अधिकारी बनवून पैशांची लूट करणाऱ्या टोळीने ७१ लाख रुपयांची लूट केल्याचे आतापर्यंतच्या तपासात निष्पन्न झाले आहे. पोलिस कर्मचारी बिपिन आनंदा पाटील (रा. धुळे) व त्याची बहीण स्वाती रोशन पाटील (रा. नाशिक), पोलिस कर्मचारी इम्रान ईसाक शेख (रा. धुळे) याला बुधवारी रात्री अटक करण्यात आली. यानंतर संशयित बबल्या बागूल यास अटक करण्यात आली आहे. ज्या व्यापाऱ्यांची अशा प्रकारे फसवणूक झाली असेल त्यांनी आझादनगर पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन श्री. धिवरे यांनी केले. पटीयाला (पंजाब) येथील व्यापारी कश्मीरसिंग सरदार हजारासिंग बाजवा (वय ५९) यांची येथे फसवणूक झाल्यानंतर ही घटना उजेडात आली आहे.

# पिडीतेवर अत्याचाराच्या आरोपातून राधेश्याम कोळी यांची निर्दोष मुक्तता

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

शिंदखेडा तालुक्यात साळवे येथील राधेश्याम चतुर कोळी (बोरसे) यांची धुळे येथील मे. जिल्हा व सत्र न्यायाधिश सो.यास्मीन देशमुख मॅडम यांनी दिनांक ३०/०१/२०२४ रोजी पिडीतेवर पळवुन नेवुन अत्याचार केल्याच्या आरोपातुन निर्दोष मुक्तता केली.

फिर्यादी पिडीत हिने शिंदखेडा पोलिस स्टेशन येथे दि. १७/०६/२०१४ रोजी भा.द. वि. कलम ३७६, ३६३,३६६ (-), ५०६ सह लहान मुलांचे लैगींक अत्याचारापासुन संरक्षण अधिनियम २०१२ (पोस्को) चे कलम ३,४,६, प्रमाणे गु.र. नं. ७०/२०१४ अन्वये आरोपी यांने दि. २९/०५/२०१४ रोजी सायंकाळी १७:०० वाजेच्या सुमारास पळवुन नेवुन नवसारी गुजरात येथे नातेवाईकांकडे नेऊन तसेच सिन्नर, नाशिक येथे पळवुन घेवुन जावुन पिडीतेस आपण पती-पत्नी आहोत असे भासवुन तिच्यावर बळजबरीने वेळोवेळी अत्याचार केला. या वरुन तात्कालीन पोलिस उपनिरीक्षक सो. वंसत भिकाजी सोनवणे यांनी तपास करुन मे. कोर्टात दोषारोप पत्र दाखल केले व सदरच्या केसचे धुळे येथील मे. जिल्हा व व सत्र न्यायालयात न्यायमुर्ती मा. यास्मीन देशमुख मॅडम यांच्या कोर्टात कामकाज चालले. सदर कामी फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार भगवानसिंग सत्तारसिंग गिरासे, डॉ. रमेश काशिनाथ गठरी, सरला छाबीलाल पवार (पोलिस शिपाई) वसंत भिकाजी सोनवणे (पोलिस उपनिरीक्षकसो.) शिंदखेडा पोलिस स्टेशन तपासी अधिकारी, एकुण ७ साक्षीदार तपासलेत मे. कोर्टाने युक्तीवाद ग्राह्य धरुन आरोपीला संशयाचा फायदा देवुन निर्दोष सोडले.सदर कामी ॲड. आनंद एस जगदेव यांना ॲड. किशोर बी. परदेशी, ॲड. वैभव व्ही. साळवे, ॲड. महेश पी. काबंळे, ॲड. रेखा सोनार, यांनी सहकार्य केले.

# महासंस्कृती महोत्सव यशस्वी करण्यासाठी सुक्ष्म नियोजन करावे : जिल्हाधिकारी गोयल

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

स्थानिक कलाकारांसाठी व्यासपीठ, लुप्त होत चाललेल्या कला, संस्कृतीचे जतन व संवर्धन तसेच स्वातंत्र्य लढ्यातील ज्ञात अज्ञात लढवय्यांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने धुळे जिल्ह्यात पाच दिवसीय महासंस्कृती महोत्सवाचे आयोजन केले जाणार आहे. हा कार्यक्रम जिल्ह्यात यशस्वी करण्यासाठी सर्व विभागांनी सुक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिले.

महासंस्कृती व महानाट्य महोत्सव निमित्त आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील सातपुडा सभागृहात



जिल्हाधिकारी श्री. गोयल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता विवेक नवले, अपर पोलीस अधिक्षक किशोर काळे, निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, उपविभागीय अधिकारी राहुल जाधव, उपजिल्हाधिकारी महेश जमदाडे, मनपाच्या अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भाऊसाहेब अकलाडे, हेमंत भदाणे, कार्यकारी अभियंता आर.आर. पाटील, मनपा उपायुक्त संगिता नांदुरकर, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका शिल्पा नाईक, जिल्हा परिषदेचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी मनिष पवार, जिल्हा माहिती व सूचना विज्ञान अधिकारी महेश खडसे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी जितेंद्र सोनवणे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. गोयल म्हणाले की, राज्य शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागातर्गंत हा महोत्सव प्रत्येक जिल्ह्यात आयोजित केला जात आहे. शासन निर्णयान्वये या महासंस्कृती महोत्सवाच्या आयोजन व सुयोग्य नियोजनासाठी समन्वय व सनियंत्रण समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीने हा पाच दिवशीय महोत्सव कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नियोजन करावे. महासंस्कृती महोत्सवात पुस्तक प्रदर्शन, छायाचित्र प्रदर्शन, पोर्स्टर प्रदर्शन, चित्रकला प्रदर्शन, बचतगट उत्पादन, वस्त्र संस्कृती दालन, शस्त्र प्रदर्शन, पर्यटन दालन, महाराष्ट्राचे संस्कृती दर्शविणारे कार्यक्रम, शिवचरित्रावर आधारीत सांस्कृतिक कार्यक्रम, लोककलेतील विविध प्रकार, पोवाडा, भारुड, गोंधळगीत, स्थानिक दुर्मिळ आणि लुप्त होत असलेल्या लोककला व संस्कृती कार्यक्रम, खानदेशातील वहीगायन, कविता, मर्दानी खेळ, शिवकालीन लोककला इत्यादी भरगच्च कार्यक्रम पाच दिवसासाठी आयोजित करण्यात येणार असल्याने हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी समितीने सुक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिल्यात.

# जय भवानी रोडवर मध्यरात्री गोळीबार : नागरिकांमध्ये भीती

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

शहरात मध्यरात्री गोळीबाराची घटना घडली आहे. संशयितांनी दोन राऊंड फायर केले आहेत. जय भवानी रोडवर ही घटना घडली आहे. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. फायर केल्यानंतर संशयितांनी घटनास्थळावरून पळ काढला. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नाशिकच्या जय भवानी रोड परिसरातील साई श्रद्धा अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या राहुल उज्जैनवाल सोबत झालेल्या जुन्या भांडणाच्या कारणावरून उज्जैनवाल कुटुंबीय मध्यरात्री झोपलेले असताना अचानक त्यांच्या इमारतीखाली येऊन एका टोळक्याने हातात कोयते घेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.त्यानंतर संशयितांनी काचेच्या बाटल्या फोडण्यात. एवढेच नाही तर काही वेळाने संशयितांकडून राहुलला समोर आणा त्याचा मुडदाच पाडतो, अशी धमकीही देण्यात आली. तसेच पिस्तूलमधून दोन राऊंड फायर करण्यात आले. त्यानंतर संशयितांनी घटनास्थळावरून पळ काढला. या घटनेमुळे नाशिक शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

## रेल्वे अर्थसंकल्पात आधुनिकीकरणावर भर

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी देशाचा अंतरिम अर्थसंकल्प संसदेत सादर केला. या अर्थसंकल्पात रेल्वेसाठी अंतर्भूत करण्यात आलेल्या तरतुदींची भारतीय अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका आहे. त्यामुळेच सर्वांचेच लक्ष रेल्वेसाठीच्या तरतुदींकडेही लागले होते. सुरक्षा, पायाभूत सोयी-सुविधांच्या सुधारणा, नवीन ट्रेन्स लॉन्च आणि रेल्वे स्थानकांचा कायापालट याकडे बजेटमध्ये लक्ष देण्यात आले आहे. यंदाच्या अंतरिम अर्थसंकल्पामध्ये महाराष्ट्रासाठी १५ हजार ५५४ कोटी रुपयांची घसघशीत अशी तरतूद करण्यात आली आहे. मागील वर्षी महाराष्ट्रात रेल्वेसाठी १३ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. पण यंदाच्या अंतरिम असलेल्या अर्थसंकल्पात रेल्वेसाठी वाढीव तरतूद केली आहे, ही महाराष्ट्रासाठी मोठी जमेची बाजू आहे. या अर्थसंकल्पातून महाराष्ट्रातील रेल्वे मार्गिकांसाठी भरघोस निधी देण्यात येईल, असे चित्र आहे. नव्या रेल्वे मार्गिकांसोबतच कसारा, कर्जत आणि पुणे या रेल्वे यार्डांचे नूतनीकरणही केले जाणार आहे. सीएसएमटी या सर्वात मोठ्या आणि महत्त्वाच्या टर्मिनससोबत एलटीटीच्या विकासासाठीदेखील निधी दिला जाणार आहे. म्हणजेच महाराष्ट्रातील एकूण सहा नवीन मार्गिकांसाठी खास तरतूद करण्यात आली आहे. त्यासाठी जवळपास १ हजार ९४० कोटी रुपये खर्च केले जाणार असल्याने अर्थसंकल्पात आधुनिकीकरणावर भर दिल्याचे दिसते. महाराष्ट्राला बजेटमध्ये रेल्वेसाठी नेमके काय मिळाले? याविषयी सर्वसामान्य मुंबईकरांसह रेल्वेतून प्रवास करणाऱ्या सर्वांनाच कुतूहल आहे. त्यातच अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे घड्याळाच्या काट्यावर धावणाऱ्या कष्टकरी मुंबईकरांचा केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने गांभीर्याने विचार केलेला दिसला. म्हणजेच मुंबईकरांसाठी आवश्यक असणाऱ्या वेगवेगळ्या सुविधा पुरविण्यासाठी मुंबई रेल विकास कॉर्पोरेशनची स्थापना करण्यात आली आहे. या संस्थेमार्फत मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट हाती घेण्यात आले आहेत. त्यापैकी एमयूटीपी १ पूर्ण झाला असून २, ३ आणि ३ ए हे अन्य प्रकल्प बाकी आहेत. त्यामध्ये जितके पैसे रेल्वे देणार आहे, तितकेच पैसे राज्य सरकारदेखील एमआरव्हीसीला देणार असल्याचे ठरले आहे. मुंबईकरांसाठी असलेल्या मुंबई रेल विकास कॉर्पोरेशनच्या एमयूटीपी प्रकल्पांना आतापर्यंत चांगला निधी मिळाला आहे. एमयूटीपी दोन प्रकल्पांना १०० कोटी मिळाले आहेत. त्यामध्ये जवळपास सर्व प्रकल्प पूर्ण झाले असून, काही प्रकल्पांची थोडी कामे बाकी आहेत. तसेच उर्वरित प्रकल्प यांच्यासाठी तरतूद केली गेली आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कुर्ला या ५व्या आणि ६व्या मार्गिकेसाठी तरतूद करण्यात आली आहे. तसेच मुंबई सेंट्रल ते बोरिवली या सहाव्या मार्गिकेसाठी देखील काम सुरू करण्यात आले आहे. म्हणजेच हे प्रकल्प पूर्णत्वास गेल्यास मुंबईकरांचे लोकल प्रवासातील हाल बऱ्याच अंशी कमी होतील, हे निश्चित. एमयूटीपीच्या ३ऱ्या प्रकल्पाला ३०० कोटी मिळाले असून, त्यात विरार-डहाणू या मार्गाचे चौपदरीकरण करण्यात येणार आहे, तर पनवेल ते कर्जत ही नवीन रेल कॉरिडॉर उभारली जाणार आहे. तसेच ऐरोली ते कळवा या नवीन उन्नत मार्गाचे कामही हाती घेतले जाणार आहे. नवीन लोकल गाड्या (नॉन एसी) सुरू केल्या जाणार आहेत. रेल्वे गाड्यांची गती वाढविल्यास रुळांवर मोठा ताण पडून अपघात होण्याची दाट शक्यता असते. हा संभाव्य धोका टाळण्यासाठी किंवा तो रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजण्यात येणार आहेत. 'एमयूटीपी ३ ए' प्रकल्पासाठी ३८८ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या तरतुदीमुळे गोरेगावपासून बोरिवलीपर्यंतच्या महत्त्वाच्या अशा हार्बर मार्गाचा विस्तार होणार आहे. या मार्गामुळे पश्चिम उपनगरे ही हार्बर मार्गाशी जोडली जाणार आहेत. तसे झाल्यास दोन्ही बाजूंचे प्रवासी दोन्ही मार्गांवर सहजगत्या प्रवास करू शकणार असल्याने सध्या त्यांना होणारा मनस्ताप खूप मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. तसेच बोरिवली आणि विरार या अहोरात्र भरूभरून वाहणाऱ्या मार्गांदरम्यान आता पाचवी आणि सहावी मार्गिका तयार झाल्यास पश्चिम रेल्वेच्या या मार्गावर सतत होणाऱ्या गर्दीला आळा बसेल आणि प्रवाशांचा त्रास कमी होईल.

## आर्थिक दृष्ट्या मागास(EBC) विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रश्न व उपाय

१९९० नंतर संपूर्ण महाराष्ट्रात इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेश घेण्याचे प्रमाण वाढले. गेल्या दहा पंधरा वर्षात संपूर्ण महाराष्ट्रात शहरी तसेच ग्रामीण भागात सरकारी मराठी माध्यमाच्या अनुदानित शाळा उपलब्ध असताना व त्यामध्ये मोफत प्रवेश शिक्षण असताना सुद्धा सर्व स्तरातील पालकांचा आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमाला प्रवेश घेण्याचे प्रमाण वाढले आहे. महाराष्ट्रातील बहुतांश पालकांचे वार्षिक उत्पन्न एक लाखापासून चार लाखापर्यंत आहे. बहुतेक इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे शुल्क वीस हजारापासून एक लाख रुपयापर्यंत आहे. मध्यम शुल्क आकारणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे शुल्क ४० ते ५० हजार रुपये आहे. दोन मुले असलेल्या पालकांना आपल्या मुलांची वार्षिक एक लाख रुपये शुल्क भरणे फारच अवघड जाते. बहुतेक पालक कर्ज काढून मुलांची शाळेचे शुल्क भरतात.

संपूर्ण महाराष्ट्रात इंग्रजी माध्यमाच्या शाळांना अनुदान नाही. शिक्षणाचा अधिकार म्हणजेच आरटीई अंतर्गत गरीब विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतो, परंतु त्यातही अनेक अडचणी आहेत व आर टी ई अंतर्गत चे पैसे महाराष्ट्र सरकारने गेले पाच वर्षे दिलेले नाहीत. महाराष्ट्रातील बहुसंख्य पालकांचा उत्पन्नातील जवळजवळ अर्धा हिस्सा मुलांच्या इंग्रजी माध्यमातील शाळांची फी भरण्यात जातो. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जरी मातृभाषेतून शिक्षण दिले पाहिजे असे सांगते तसेच जगभर संशोधनातून मातृभाषेतील शिक्षण अधिक प्रभावी असते असे आढळून आले आहे, तरी इंग्रजी माध्यमाच्या शाळांना प्रवेश घेण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढते आहे ही मात्र वस्तुस्थिती आहे.

संपूर्ण भारतात भारत सरकारच्या दोन हजार सीबीएसई शाळा व नवोदय शाळा अशा एकत्रित ४ हजार सीबीएसई च्या केंद्रीय शाळा आहेत. पालकांचा इंग्रजी माध्यमाचा कल बघता व महाराष्ट्र शासनाचे इंग्रजी माध्यमाच्या शाळांना अनुदान न देण्याचे धोरण बघता, भारत सरकारने भारतातील १५० कोटी लोकांकरता, प्रत्येक लाखाला एक याप्रमाणे पंधरा हजार सीबीएसईच्या अनुदानित केंद्रीय शाळा काढाव्यात. कोणत्याही अनुदानित इंग्रजी माध्यमाच्या सीबीएसईच्या शाळांमधील अंतर २० किलोमीटर पेक्षा जास्त असू नये, असे बघावे.

महाराष्ट्र शासनाने आठ लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या सर्व ईबीसी म्हणजेच आर्थिक दृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना प्ले ग्रुप पासून त्यांनी जर इंग्रजी माध्यमाच्या शाळांना प्रवेश घेतला असेल तर वीस हजार रुपये प्रत्येक पाल्यामागे पालकाला द्यावेत. सरकार तर्फे ईबीसी विद्यार्थ्यांची फी शाळेत जमा केली जावी. मराठी माध्यमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमागे महाराष्ट्र शासन सरासरी २० हजार रुपये खर्च करीत आहेच.

सध्या संपूर्ण महाराष्ट्रात व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या ईबीसी विद्यार्थ्यांना सरकारतर्फे अर्धी फी दिली जाते तसेच नुकत्याच सरकारने जाहीर केलेल्या जीआर नुसार वसतीगृह व भोजन भत्त्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणापासून तालुक्याच्या ठिकाणापर्यंत सरकार ६० हजारांपासून ३८ हजारापर्यंत विद्यार्थ्यांना वसतीगृह व भोजन भत्ता देणार आहे .याबद्दल सरकारचे अभिनंदन केले पाहिजे. सरकारचा हा निर्णय संपूर्ण महाराष्ट्रात बहुसंख्येने असलेल्या ईबीसी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती करता क्रांतिकारी निर्णय आहे. परंतु व्यवसायिक महाविद्यालयांची अर्धी देखील फी देणे ईबीसी विद्यार्थ्यांच्या पालकांना शक्य होत नाही. त्यामुळे सर्वच ईबीसी विद्यार्थ्यांना म्हणजेच आठ लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या पालकांच्या पाल्यांना सरकारने सर्व प्रकारच्या व्यवसायिक अभ्यासक्रमा करता पूर्ण फी द्यावी.

यावर्षी भारतातून १५ लाख विद्यार्थी परदेशात शिकायला गेले. मागील वर्षी १२ लाख विद्यार्थी गेले होते. १९९० नंतर इंग्रजी माध्यमाच्या शाळा तसेच आयटी शिक्षणाचा प्रचार व प्रसार यामुळे परदेशात शिक्षणासाठी व नोकरीसाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. भारत सरकारच्या अधिकृत आकडेवारीनुसार सव्वातीन कोटी भारतीय परदेशात राहतात. भारत सरकारच्या अधिकृत आकडेवारीनुसार मागील वर्षी परदेशात राहणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांनी भारतात दहा लाख कोटी रुपये पाठवले.

या पाठवलेल्या रकमेची चार प्रकारे विभागणी करता येईल

१.आपल्या भारतातील कुटुंबासाठी पाठवलेले पैसे

२.परदेशी शिक्षणासाठी भारतीय बँकेतून घेतलेल्या कर्जाची परतफेड म्हणून पाठवलेले पैसे

३.भारतात स्थावर मालमत्ता घेण्याकरता पाठवलेले पैसे

४.भारतीय भांडवली बाजारात केलेली गुंतवणूक

यातील चौथ्या प्रकारातील पैसे फक्त परत जातात. म्हणजेच भारताच्या विकासाला परदेशात राहणारी भारतीय मोठ्या प्रमाणावर पाठबळ देत आहेत.



शब्द संवाद

प्राचार्य प्रशांत पाटील

(नाशिक) मो.९५११८५९९३९

परदेशात राहणाऱ्या सव्वातीन कोटी भारतीयांची संपत्ती इंग्लंड मधील सर्व लोकांच्या संपत्तीपेक्षा जास्त झाली आहे. येणाऱ्या दहा वर्षात परदेशात राहणाऱ्या भारतीयांची संख्या दहा कोटी होणार आहे व त्यांच्याकडची संपत्ती अमेरिकेच्या एकूण लोकांच्या संपत्ती पेक्षा जास्त असणार आहे.

जगभराच्या उत्कृष्ट शैक्षणिक संस्थांमध्ये उत्तम शिक्षण घेणे हा प्रत्येकाचा हक्क आहे. परंतु ईबीसी कॅटेगिरीतल्या विद्यार्थ्यांना, बँका सहजपणे इतर विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज देतात, तसे घेणे शक्य होत नाही. कारण ईबीसी विद्यार्थ्यांच्या पालकांकडे बँकांकडे गहाण ठेवण्यासाठी स्थावर मालमत्ता नाही. गेल्या ३० वर्षात परदेशात शिकायला गेलेल्या विद्यार्थ्यांनी शिक्षणाकरता घेतलेल्या कर्जाची परतफेड मोठ्या प्रमाणावर केली आहे. त्याचबरोबर भारताच्या विकासाला मोठा हातभार लावला आहे. त्यामुळे ईबीसी कॅटेगिरीतल्या विद्यार्थ्यां करता भारतात तसेच भारताबाहेर शिक्षण घेण्याकरता, त्यांच्या पालकांकडे गहाण ठेवायला कोणतीही मालमत्ता नसल्यामुळे, कोणतेही तारण न घेता शैक्षणिक कर्ज द्यावे. ईबीसी विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना कर्जावरील व्याज माफ करावे.

ईबीसी विद्यार्थ्यांवर होणारा खर्च, हा खर्च न समजता पायाभूत क्षेत्रातील गुंतवणूक समजावी, त्यामुळे उद्याच्या भारताच्या विकासात बहुसंख्येने असलेले ईबीसी कॅटेगिरी विद्यार्थी फार महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात.

भारत जागतिक शक्ती व्हायची असेल तर बहुतांश आर्थिक स्थिती नसलेल्या महाराष्ट्रातील व भारतातील ईबीसी कॅटेगरीतल्या विद्यार्थ्यांना शालेय, महाविद्यालयीन तसेच परदेशातील शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर मदत करायला हवी.

१. शालेय स्तरावर सर्व ईबीसी विद्यार्थ्यांच्या किमान २० हजार रुपये दरवर्षी शाळेचे शुल्क देण्यात यावे.

२. सध्या भारत सरकारच्या ४ हजार सीबीएसई माध्यमाच्या केंद्रीय शाळा, दीडशे कोटी लोकसंख्येसाठी, प्रत्येक एक लाख लोकसंख्येमागे एक, या प्रमाणात वाढवून १५ हजार अनुदानित सीबीएसई केंद्रीय शाळा करण्यात याव्यात. कोणत्याही केंद्रीय शाळेचे एकमेकांपासून अंतर वीस किलोमीटर पेक्षा जास्त असू नये.

३ सर्व प्रकारच्या व्यवसायिक अभ्यासक्रमा साठी विद्यार्थ्यांना संपूर्ण फी सरकारतर्फे देण्यात यावी.

४.भारतात तसेच परदेशात शिक्षण घेण्यासाठी ईबीसी विद्यार्थ्यांना बँकांनी कर्ज देताना कोणत्याही प्रकारचे तारण ठेवण्याची अट काढून टाकावी व महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाने या कर्जाची जबाबदारी घ्यावी.

ईबीसी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कर्जावरील व्याज, शिक्षण पूर्ण होईपर्यंत महाराष्ट्र सरकार तसेच भारत सरकारने भरावे. शिक्षण पूर्ण झाल्यावर ईबीसी कर्जाची परतफेड करतीलच. याबाबत महाराष्ट्र सरकार व भारत सरकारने लवकरात लवकर विद्यार्थी हिताचा निर्णय घेऊन विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा.

## विद्यार्थ्यांवर 'असर' नेमका कशाचा?

भारतीय युवकांच्या मनावर डिजिटल माध्यमांनी गारूड केले असून, त्याचा शैक्षणिक प्रगतीवर वाईट परिणाम होताना दिसून येतो अशी ओरड सध्या ऐकायला मिळते. कारण 'असर' संस्थेच्या सर्वेक्षणातून हे सत्य समोर आले आहे की, आजही देशात ग्रामीण भागातील ८ वी ९ वीच्या अनेक मुलांना नीट लिहिता - वाचता देखील येत नाही. 'असर'च्या या संशोधनातून शिक्षणावर होणारे अनेक 'असर' म्हणजे 'परिणाम' किंवा 'प्रभाव'अधोरेखीत होतात. त्यांची व्याप्ती खूप मोठी आहे. मग या मुलांच्या प्रगतीवर नेमका कशाचा 'असर' झालाय याचे कुतूहल प्रत्येकाच्या मनात आहे.


'असर' या संस्थेने भारतातील ग्रामीण भागांमधील १४ ते १८ वर्षांच्या युवकांवर लक्ष केंद्रित करून केलेल्या २०२३च्या सर्वेक्षणात सुमारे २५ टक्के युवकांना आपल्या मातृभाषेतील इयत्ता दुसरीच्या पुस्तकातील धडा वाचता येत नव्हता. ही बाब आधुनिक भारताच्या प्रगतीला निश्चितच मारक आहे. डिजिटल युगात प्रगतीच्या वारूवर स्वार होताना मातृभाषेतून चार ओळी वाचता येऊ नये, असे असताना दुसरीकडे मात्र अनेक शाळांमध्ये रोबोटिक्स आणि कोडिंगचे प्रशिक्षण दिले जाते आहे. विद्यार्थ्यांची कार्यकुशलता वाढविण्यावर भर दिला जात आहे. एकूण हा अहवाल आल्यानंतर आपल्या शिक्षण व्यवस्थेचे चांगलेच वाभाडे निघाले. त्यानंतर काही दिवसांतच राज्य सरकारने नवे धोरण आखले.

शाळांच्या अचानक भेटी दरम्यान जर विद्यार्थी कमकुवत आढळला, तर त्याची जबाबदारी आता शिक्षकांवर असेल, ज्या शिक्षकांच्या वर्गातील विद्यार्थ्यांची गुणवत्त कमी आढळून येईल, अशा शिक्षकांना प्रशिक्षणासाठी पाठवण्याच्या सूचना राज्य सरकारने केल्या आहेत. या भेटीचा आढावा दर महिन्याला घ्यावा लागणार आहे. तसेच केंद्र प्रमुखांना अचानक भेटी देण्याच्या सूचना देखील देण्यात आल्या आहेत. 'असर'च्या सर्वेक्षणात राज्यातील नांदेड ग्रामीणमधील ६० गावांतील १,३७४ युवकांची निवड करण्यात आली होती. त्यामध्ये कृती, कौशल्य, मूलभूत क्षमता तसेच डिजिटल साक्षरता व कौशल्य हे प्रमुख निकष ठेवण्यात आले होते. यामध्ये भूलभूत कौशल्य व डिजिटल साक्षरतेमध्ये राज्याची कामगिरी निराशाजनक आढळली होती; परंतु ही निराशा आत्ताचीची आहे असे नाही. अनेक दशकांपासूनचा हा प्रश्न आजही कायम आहे. कारण शिकणे आणि शिकवणे याचा समन्वय साधण्यासाठी मुलांना शिकण्याची आवड असावी लागते. तसेच सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक, भौगोलिक बाबींचाही संबंध यामध्ये येतो. शाळेतील वातावरण, शिक्षक आणि संस्थांची धोरणे, सरकारी नियम देखील याला कारणीभूत ठरतात. मधल्या काही काळात तर ग्रामीण शिक्षकांवर शाळाबाह्य कामांचे ओझे देखील होते. त्याचा साहजिकच शिकवण्यावर परिणाम होत होता हे विसरून चालणार नाही. आता तर महाराष्ट्रात अनेक जिल्हा परिषदांच्या शाळा एक शिक्षकी बनल्या आहेत. एकच शिक्षक १ ली ते चौथीपर्यंत वर्ग शिकवतो. तसेच अनेक शाळा दुर्गम भागात आहेत, तर अनेक शाळा मोडकळीस आल्या आहेत, तर काही पावसाळ्यात शाळा गळतात देखील, या सगळ्याचा परिणाम विद्यार्थ्यांवर होतो हे दुर्लक्षून चालणार नाही.

'असर' संस्थेचा शैक्षणिक रिपोर्ट प्रासार माध्यमांनी दाखवला आणि आपली मराठी शाळा आठवली. कारण या बातमीनंतर मन भूतकाळात डोकावू लागले. 'छडी लागे छमछम विद्या येई घमघम' ही पूर्वीची एक म्हण यानिमित्ताने आठवली. आता तर शिक्षकांच्या हातातली ती छडी गायब झाली आहे. काही वर्षांपासून पालकांनी केलेल्या तक्रारीमुळे शिक्षकांना धड रागावताही येत नाही. तसा कायदा तयार करण्यात आला आहे. कारण काही आगावू शिक्षकांनी लेकरांना बेदम मारहाण केली. काहींनी तर अक्षरश: मुलांना बदडूनही काढले. त्याच्यांमुळे शिक्षकांच्या अनावर रागावर नियंत्रण आले खरे; पण मुलं आता कुणालाच दाद देईनाशी झाली आहेत. त्यातच मुलांची घोकंपट्टीही कमी झाली आहे. **क्रमश:**

**- रूपाली केळस्कर**

## शब्दकोडे-३११



**आडवे शब्द :**

१. हाती घेतलेले काम पूर्ण करा, या अर्थाचा सुविचार ७. हिशोबाची वही ११. चेष्टा १२. क्रिकेटमधील धाव १३. बोटावरील आवरण १४. ठोक! हाण! १५. ललाट १६. कौतुक (ग्रामीण) १८. वय लपवणारा रंग १९. सरहद्द २०. पुष्कळ २२. हालणे, बाजूला होणे २३. संगीतातील लकेर २४. मोळी, गवताची पेंडी २५. घरोब्याचे २७. मालक २८. वसवलेली वस्ती ३०. सोज्वळ, प्रामाणिक ३२. रत्न ३४. चकचकीत, स्वच्छ ३७. पोपट ३८. बेहिशोबी, पुष्कळ ४१. खांदा, खांद्याचे हाड ४१अ. लटकवणे, चिकटवणे ४२. लोखंड घासण्याचे हत्यार ४३. पद्धतीनुसार ४४. अग्री ४७. अवधान, लक्ष ४८. बेताचे गरम ४९. छिद्रातून, खिडकीतून पडणारे ऊन ५०. नंतर ५१. गुच्छाने आलेले ५२.. उत्तराधिकारी ५४. योग्यता, लायकी ५६. युद्ध ५८. सांगणे ५९. किंमत ६०. अर्धी ओंजळ ६२. दोन्ही बाजूने घातक शस्त्र ६३. छोटा, बारीक ६६. साखरेचा रस ६८. वाढलेला व्याप ६९. हिंदीत पर्यंत, मराठीत प्रतीक्षा ७१. देवांचा राजा ७२. गुप्त रस्ता ७४. निर्धन ७६. बातमी ७८. डोंगर ७९. खबदाड ८०. चटकन, त्वरित

**उभे शब्द :**

१. बाजार २. धनुष्यबाण ३. बडबडी, लोचट स्त्री ४. सरस, नीरस अशी भावना ५. विद्यापीठातील विभागप्रमुख ६. न्यायासंबंधी ८. वडील ९. खुंटी १०. शिजवताना पदार्थ जळणे १४. धनी-धनीण १७. अंधार १८. हात १९. राम-रावण युद्धाला कारणीभूत ठरलेले रावणाचे कृत्य २१. चांगले वाईट २२. दक्षकन्या २६. गुरे राखणारा २७. श्रीमंत २९. समशेर ३१. संपुष्टात येणे ३३. आईचा भाऊ ३५. दुष्ट ३६. त्वरित, लगेच ३९. घोड्यांच्या शर्यतीची जागा (इंग्रजी) ४०. धोबी ४१. अफूचे बी ४२. कानात सांगितलेला सल्ला ४४. ब्रेड ४५. समुद्रातील अग्री ४९. एकदम नवीन ५०. भिस्त ५०अ. फळातील खाद्य ५१. काळजी, चिंता ५३. घर ५४. झाडाची पाने, काड्या इ. ५५. ज्वर, दाह ५७. मुघल वास्तुकलेचे वैशिष्ट्य ६१. भेग, चीर, पोकळ जागा ६२. सकाळी बारानंतरची वेळ ६४. चलनवलन ६५. चंद्राची कड ६७. टॅक्स (मराठी) ७०. वाळवी ७३. मांजरीचा भाचा ७४. स्थिती, दशा ७५. बगळा ७७. आवाज, ध्वनी

### शब्दकोडे-३१० चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.चलनवलन ४.जिवावर उदार होणे १०.कव ११.नवरंग १२.तळ १३.हिमालय १५.लवा १६.हजर १८.नवा १९.अगरबत्ती २१.समरस २४.तम २६.आम २७.नारद २८.सकाळ दुपार संध्याकाळ ३१.शीतकर ३३.कुल ३४.तन ३५.पात ३६.लत ३७.तलमसुती ३८.विनंती ३९.वाईट ४१.बाप ४२.चाकर ४४.लडिवाळ ४६.कर्जबाजारी ४८.चरस ४९.भला ५०.दादर ५२.गो ५३.सणवार ५५.शरम ५६.धनुष्यबाण ५७.डीन ५८.दारू ६१.कच ६३.वेताळसेना ६६.टीका ६७.मरगळणे ७१.रजत ७२.मनमुराद ७३.नीरस

**उभे उत्तर**

१.चकचकीत २.लव ३.वर्तमानकाळ भूतकाळ भविष्यकाळ ४.जिवलग ५.वारंवार ६.वग ७.उमज ८.रत ९.होळकर १४.लवा १६.हत्ती १७.रसरशीत १९.अमर २०.बरका २२.मदत २३.समोर २५.मसलत २६.आपादमस्तक २९.संतती ३०.ध्यान ३२.कसाई ३३.कुलशील ३५.पातीचा चहा ३८.विपरीत ३९.वारसदार ४०.टणत्कार ४१.बाजा ४३.कर ४५.डिब्बा ४७.बालवाडी ५१.दमदाटी ५३.सणक ५४.रनवे ५४अ.टवाळ ५५.शबाना ५९.रुकावट ६०.समर ६२.चलन ६४.ताकद ६५.सेनानी ६८.रज ६९.गत ७०.कोस

## विकासकामे अन् कागदावरच्या शासकीय योजना!

त्या विकासकामांचा निश्चितच दर्जा तपासावा लागेल. तो दर्जा सुधारला तर असंख्य विकासकामे कोकणात झाल्याचे दिसून येतील. एकिकडे विकासकामे होत असली तरीही केंद्र व राज्य सरकारच्या योजना तळा-गाळापर्यंत पोहोचतच नाहीत. अनेक शासकीय योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचलेल्या नसतात. एकतर कोकणातील जनता 'गजाली'मध्ये रमणारी असली तरीही शासकीय योजना कोणत्या आहेत, त्या योजनांचे लाभ कसे घ्यावेत, सर्वसामान्य जनतेसाठी कोणत्या योजनांचा लाभ होऊ शकतो त्यासाठी आपण काय करणे आवश्यक आहे, याची माहितीच नसते. प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ जास्तीत-जास्त लोकांना देण्यासाठी कधीही उत्सुक नसतात.

याउलट लाभार्थ्यांपर्यंत ती माहिती कशी पोहोचणार नाही, याची जणू व्यवस्थाच करण्यात आलेली असते. जेव्हा कोकणातील लोकांना काही काम-धंदा करायलाच नको, असे आपण म्हणतो तेव्हा एखाद्या योजनेचा लाभ घेण्यासाठी जर कोणी पुढाकार घेऊन प्रपोजल तयार करण्याचा प्रयत्न केला, तर शासकीय कार्यालयातून अडवणूक ही ठरलेलीच असते. यामुळे आधीच फार उत्सुक नसलेला कोकणवासीय योजनेचा लाभ घेण्याच्या फंदात पडत नाही. शासनाच्या असंख्य चांगल्या योजना आहेत. अनेक योजनातून सर्वसामान्य जनतेचे संसार फुलू शकतात. कुटुंब उभी राहू शकतात; परंतु या योजना लोकांपर्यंत पोहोचत नाहीत. पूर्वी गावो-गावचे कार्यकर्ते या अशा योजनांची माहिती गावातील ग्रामस्थांपर्यंत पोहोचवायचे. लाभार्थ्यांच्या कागदपत्रांची पूर्तता करत परिपूर्ण प्रस्ताव शासकीय कार्यालयात जायचे. यामुळे शासकीय योजनांचा लाभ चांगला मिळायचा. आता शासकीय कार्यालयातील ऑनलाइन-ऑफलाइनच्या कार्यपद्धतीत सामान्य जनतेचा जीव मेटाकुटीस येतो. साधा तहसीलदार कार्यालयात कुठलेही दाखले घेण्यासाठी जो काही छळ मांडला जातो, त्यामुळे दाखला नको पण हेलपाटे नको अशी म्हणण्याची वेळ सामान्य शेतकऱ्यावर येते. 'नेटवर्क' नाही हे कारण सांगून सामान्य शेतकऱ्याला त्रास देणारे कारकून आजही शासकीय कार्यालयातून दिसतात.

एखाद्या दाखल्यासाठी पाच मिनिटांत होणार असेल तरीही दहा-पंधरा वेळा फेऱ्या मारायला लावण्यात शासकीय कार्यालयातील या रावसाहेब भाऊसाहेबांना कोणता आनंद मिळतो कुणास ठाऊक! खरंतर सामाजिक, राजकीय कार्यकर्त्यांनी शासकीय योजनांची माहिती घेऊन गावातील कोणत्या योजनेचा लाभ कोण घेऊन शकतो, याचा विचार करून लाभार्थी संख्या कशी वाढेल हे पाहिले पाहिजे. यासाठी संवेदनशील कार्यकर्ता असला पाहिजे. तरच त्यातून चांगल काही घडू शकेल. नेहमीच विकासकामे आणि शासकीय योजना यांची गल्लत केली जाते. विकासकामे ही आमदार, खासदार, मंत्री या प्रयत्नातून दूरदृष्टीतून होतच असतात; परंतु शासकीय योजनांचा फायदा जास्तीत-जास्त लोकांपर्यंत होण्यासाठी हे प्रयत्न करावे लागतील तेव्हाच शासकीय सामान्यजनतेपर्यंत पोहोचू शकतील. योजनांचा लाभ घेऊन अनेक कुटुंब आर्थिक सक्षमतेने उभी राहू शकतील. **समाप्त:**

**- संतोष वायंगणकर**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# राज्यातील ढासळती कायदा व सुव्यवस्था बघता फडणवीस यांनी गृहमंत्री पदाचा राजीनामा द्यावा

### आम आदमी पार्टीची मागणी

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

महाराष्ट्रात जेव्हापासून देवेंद्र फडवणीस यांनी गृहमंत्री पदाचा कार्यभार हातात घेतला आहे, तेव्हापासून राज्याची कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती बिकट झाली आहे. दिवसा-ढवळ्या खून, बलात्कार, दरोडा पडत आहेत. गृह विभागाचा कुठल्याही प्रकारचा अंकुश राहिला नसून परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात आहे, देवेंद्र फडवणीस हे राज्यात फक्त भाजपाचा प्रचार सोडून दुसरे कुठलेही काम करताना दिसत नाहीत. आज राज्यात पेपरफुटी सारख्या घटना होत आहेत. बिहार आणि उत्तर प्रदेशमध्ये ज्याप्रकारे पेपर फुटीच्या सर्रास घटना होत असतात, त्याच पद्धतीने महाराष्ट्रात सुद्धा होत आहे. असा आरोप करत आम आदमी पार्टीने उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री फडवणीस यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी केली आहे.




निवेदनात म्हटले आहे की, गृहमंत्रालयाशी वेळोवेळी पत्रव्यवहार करून, आंदोलने, आक्रोश मोर्चा काढून सुद्धा गृहमंत्र्यांवर याचा कुठलाही परिणाम झालेला नाही. पन्नास खोके घेवून बेकायदेशीर शिंदे-फडणवीस सरकार स्थापन झाल्यापासून राज्यातील कायदा व सुव्यवस्था दिवसेंदिवस ढासळत चालली आहे. देवेंद्र फडणवीस हे भ्रष्टाचार आणि गुंडागर्दी थांबवण्यासाठी पूर्णपणे अपयशी गृहमंत्री ठरले आहेत. काल उल्हासनगरमध्ये भाजप आमदाराने पोलीस ठाण्यात गोळीबार केल्याने राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था किती ढासळली आहे, हे दिसून येते. फडणवीसांच्या संरक्षणात भाजपचा आमदार पोलीस ठाण्यात गोळीबार करू शकतो, तर राज्यातील सर्वसामान्य जनता सुरक्षित कशी राहणार? असा प्रश्न आम आदमी पार्टी मुख्यमंत्र्यांना आणि गृहमंत्र्यांना विचारत आहे, राज्यातील लोक सध्या खूपच घाबरले असून न्यायासाठी कुणाकडे जावे असाही प्रश्न करीत आहेत.

महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था सुधारण्यासाठी आणि सत्ताधाऱ्यांनी पोसलेल्या गुंडगिरीला आळा घालण्यासाठी आम आदमी पार्टीने काही मागण्या केल्या आहेत. त्यात अकार्यक्षम गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पदावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तात्काळ हटवावे. तसेच कायदा आणि सुव्यवस्था सुधारण्यासाठी कोणत्याही पक्षाच्या गुंडगिरी करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे.

भाजप नेते आणि आमदारांची गुंडगिरी थांबवण्यासाठी कारवाई करण्याची हिंमत गृहमंत्र्यांनी दाखवावी. यावेळी राज्य संघटन मंत्री नविंदर अहलुवालिया, राज्य मीडिया प्रमुख चंदन पवार, पदाधिकारी गिरीश पाटील, स्वप्निल घिया, कलविंदर गरेवाल, युवा राज्य संघटन मंत्री प्रदीप लोखंडे, अमर गांगुर्डे, विकास पाटील, गोरख मोहिते, पद्माकर अहिरे, सुमित शर्मा, विश्वजीत सावंत, संजय कातकाडे, दिपक सरोदे, नूतन कोरडे, अल्ताफ शेख आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## न्यूज कॉलम

### भरदिवसा साडेसात लाखाची चोरी

**मालेगाव ।** शहरातील सर्वाधिक गजबजलेल्या मोसम पुल चौकातील लोढा मार्केट व्यापारी संकुलात भरदिवसा साडेसात लाखाची चोरी झाल्याने खळबळ उडाली आहे. व्यापारी संकुलातील रेडीमेड कपड्यांच्या दुकानात खरेदी करण्यासाठी गेलेल्या तरुणाच्या दुचाकीच्या डिक्कीतून दोघा चोरट्यांनी सफाईदारपणे ७ लाख ८० हजार रुपये लंपास केले. दोघे चोरटे सीसीटीव्हीत कैद झाले आहेत. शुक्रवारी (ता. २) सायंकाळी साडेचारच्या सुमारास हा प्रकार घडला. या चोरट्यांना पकडण्याचे मोठे आव्हान छावणी पोलिसांसमोर आहे. शहर व परिसरात गेल्या काही दिवसात चोऱ्या, घरफोड्यांचे प्रमाण वाढले आहे. शेखर देवराम पवार (वय २८, रा. तळवाडे, ता. मालेगाव) हा तरुण मका व शेतमाल विक्रीतून बँकेत आलेले पैसे काढण्यासाठी आला होता.



# राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत दिव्यांग विद्यार्थ्यांचे सुयश

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

प्रथमच नागपूर येथे झालेल्या विशेष ऑलम्पिक स्पर्धेत दोन दिव्यांग विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले. त्यांचे श्री गुरुदेव बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या सचिव प्रमिला कोकड व सहकाऱ्यांनी नाशिकरोड स्थानकात औक्षण करून स्वागत केले.

भारत महाराष्ट्र आयोजित स्टेट चॅम्पियनशिप ट्रायल कॅम्प नागपूर २०२४ आयोजित मतिमंद शाळेमध्ये दिव्य विद्यालय मतिमंद मुलांची निवासी (जव्हार) या शाळेतील पालघर जिल्ह्यातून राज्यस्तरीय खेळासाठी दोन विद्यार्थ्यांची निवड झाली होती. २१ ते २५ वयोगटातील तुषार संजय सापाटा या विद्यार्थ्याने १०० मीटर धावणे द्वितीय क्रमांक तर पळत येऊन लांब उडी या स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला, तर सागर उत्तम वाघेरे याला गोळा फेक स्पर्धेत उत्तेजनार्थक प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. राजेंद्र सूर्यवंशी व विलास चव्हाण या शिक्षकांचे यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील २६ जिल्हे सहभागी झाले होते. त्या सर्व विद्यार्थ्यांमधून दुसरे व तिसरे स्थान पटकावणे खूपच अभिमानाची व कौतुकास्पद गोष्ट आहे.

# लासलगाव रेल्वे उड्डाणपुल,लासलगाव विंचूर रस्ता लवकरच मार्गी लागणार-मंत्री भुजबळ

**लासलगाव । वार्ताहर**

राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी काल थेटाळे येथे लासलगाव बाजार समितीचे संचालक ज्ञानेश्र्वर जगताप यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.यावेळी जगताप परिवार व पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने मंत्री छगन भुजबळ यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी बाजार समितीचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर, संचालक पंढरीनाथ थोरे, ज्ञानेश्वर जगताप, सुवर्णा जगताप, उपसभापती गणेश डोमाडे, कार्याध्यक्ष भाऊसाहेब भवर, सरपंच दत्तुपंत डुकरे, दत्ताकाका रायते, डॉ.श्रीकांत आवारे, शिवाजी सुपनर, मधुकर गायकर, सरपंच शितल शिंदे, बबन शिंदे, राहुल डूमरे, उन्मेष डूमरे,तुकाराम गांगुर्डे, महिला अध्यक्षा सुरेखा नागरे, चाफेकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते. यावेळी मंत्री छगन भुजबळ यांनी उपस्थितांशी संवाद साधला. तसेच रामाचे पिंपळस ते येवला पर्यंत चौपदरी करण रस्त्याचे काँक्रीटीकरण यासाठी ५६० कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून लवकरच या कामाला सुरू सुरुवात करण्यात येईल असे त्यांनी यावेळी सांगितले.

### मंदिरातून लॅपटॉप चोरणारा पोलिसांच्या ताब्यात

**नाशिक ।** मंदिरात दर्शनासाठी आलेल्या एका भाविकांची लॅपटॉपची बॅग चोरी करणारा चोरटा इंदिरानगर पोलिसांनी ताब्यात घेत मोबाईल फोन आणि हार्ड डिस्क असा एकूण ३५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. ओंकार भीमराव कातकाडे ऑफिसला जाताना महादेव मंदिरात दर्शन घेण्यासाठी थांबले होते. या वेळी मंदिराच्या बाहेर ठेवलेली बॅग चोरट्याने घेऊन पोबारा केला होता.

# निरंकारी सद्गुरू माता सुदीक्षाजी महाराजांचे नाशिक नगरीत प्रवचन

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

संत निरंकारी मिशनच्या प्रमुख सदगुरू माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमीत जी यांचे नाशिक पावन नगरीत येत्या ४ फेब्रुवारी रोजी आगमन होत आहे. मोदी ग्राऊंड साधुग्राम मैदान तपोवन येथे सायंकाळी ५ ते ८ वाजे दरम्यान त्यांच्या पावन छत्रछायेमध्ये विशाल एकदिवसीय संत समागमाचे आयोजन करण्यात आले आहे.



या कार्यक्रमात सद्गुरु माताजी यांचे अमृतमय प्रवचन होणार आहे.

संत निरंकारी मिशनचा महाराष्ट्र समागम नुकताच नागपूर येथे मोठ्या उत्साहात साजरा झाला. समागमनंतर लगेचच माता सुदिक्षाजी महाराज ह्या नाशिक पावन भूमीत येत असल्याने संत निरंकारी भक्तांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. नागपुर नगरीत झालेल्या महाराष्ट्र समागम नंतर पहिल्यांदाच माता सुदिक्षाजी येत असून नाशिककर भाविकांनी या सत्संग सोहळ्याला उपस्थित राहून सद्गुरूंच्या दिव्य दर्शनाचा व प्रवचनाचा भाविक भक्तगणानी लाभ घ्यावा असे आवाहन संत निरंकारी मंडळ नाशिक परिक्षेत्राचे प्रमुख जनार्दन पाटील व सेक्टर संयोजक गुलाब पंजवाणी यांनी केले आहे.

# शाळा, महाविद्यालयाच्या परिसरातील टवाळखोरांचा बंदोबस्त करा

### मनसे विद्यार्थी सेनेची पोलीस आयुक्त यांच्याकडे मागणी

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



नाशिक महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. सीताराम कोल्हे यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. नाशिक शहरातील सर्व शाळा व महाविद्यालय परिसरातील टवाळखोरांचा उपद्रव, तरुणींची छेडछाड व दामिनी पथक नेमण्याबाबत तसेच अवैध पान मसाला, गुटखा विक्री करणारे यांचा बंदोबस्त करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

नाशिक शहरातील सर्व शाळा आणि महाविद्यालयाच्या परीसरात रोज टपोरी, टवाळखोर मुलांचा वावर वाढला असून त्यामुळे शाळा, महाविद्यालयात परिसरात छेडछाडीच्या घटना घडत आहेत. येणाऱ्या, जाणाऱ्या विद्यार्थीनींना शाळा, महाविद्यालयात जाणे अवघड होत आहे. परंतु ही गोष्ट घरी जर सांगितली तर घरचे शाळा, महाविद्यालयात जाणे बंद करतील म्हणून विद्यार्थिनी घाबरत शाळा, महाविद्यालयात जात आहेत. नाशिक शहरामध्ये विद्यालयांजवळ टवाळखोरांचा उपद्रव, तरुणींची छेडछाड व शाळा कॉलेजजवळ पानटपरी असल्यामुळे तरुणांना लागत असलेली व्यसने यामुळे पालक त्रस्त झाले आहेत. विद्यालय व कोचिंग क्लासेस, कॉलेजेस बाहेर टवाळखोरांचा उपद्रव, तरुणींची छेडछाडीचे प्रमाण वाढले आहे. शाळा, कॉलेज व कोचिंग क्लासेस जवळच्या परिसरात पान टपरी, बिअर, वाईन शॉपचे दुकाने असल्यामुळे शाळकरी व कॉलेजेसमधील युवक सिगारेट ,गुटखा व तंबाखूचे व्यसन करीत असतात. गांजा, एमडी ड्रग्स विक्रीची शक्यता नाकारता येत नाही. आता शहरात अवैध गुटखा, एमडी नशा करणाऱ्यांचे प्रमाण प्रचंड प्रमाणावर वाढले असून त्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थी या नशेच्या आहारी जात आहेत. तसेच सर्व शाळा व महाविद्यालयात महिला सुरक्षा हेल्पलाईन नंबर दर्शनी भागात लावण्याचे आवाहन करण्यास सांगावे आदी प्रकारच्या मागण्या करण्यात आल्या. यावेळी मनसे विद्यार्थी सेना प्रदेश उपाध्यक्ष संदीप भवर, प्रदेश कार्यकारणी सदस्य बाजीराव मते, जिल्हाध्यक्ष मनोज गोवर्धने, उपजिल्हाध्यक्ष नितीन धानापुणे, शहर अध्यक्ष ललित वाघ, शहर उपाध्यक्ष अमोल भालेराव, विभाग अध्यक्ष मेघराज नवले, अजिंक्य देवरे, गणेश शेजुळ, अविनाश जाधव, प्रसाद घुमरे आदी उपस्थित होते.

# नाशिक जिल्हा रुग्णालयात कर्मचाऱ्याचा मृत्यु

**नाशिक ।** येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात माळी काम करणाऱ्या कर्मचाऱ्याचा शनिवारी (ता.३) सकाळी मृत्यू झाल्याचे उघडकीस आले. एकनाथ त्र्यंबक गायकवाड (रा. लहवित) असे मयत कर्मचाऱ्याचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एकनाथ गायकवाड हे रुग्णालयात माळी काम करायचे. शनिवारी (ता. ३) सकाळी दहा वाजता ते नेहमीप्रमाणे कामावर आले होते. मात्र बराच वेळ झाला तरी ते त्यांच्या सोबतच्या सहकाऱ्यांना दिसले नाहीत. काही सहकाऱ्यांनी त्यांच्या मोबाईलवर संपर्कही साधला असता, ते उचलत नव्हते. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी त्यांचा शोध सुरू केला. त्यावेळी ते नवीन इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर ते गंभीर जखमी अवस्थेमध्ये पडलेले आढळून आले. त्यांच्या चेहऱ्यास व डोक्यास गंभीर दुखापत झालेली होती. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता त्यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकार्यांनी तपासून सांगितले.




# उपलब्ध सेवा-सुविधांचे नागरिकांनी संवर्धन करावे : मंत्री छगन भुजबळ

**लासलगाव । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

नागरिकांना सर्व प्रकारच्या सेवा-सुविधा उपलब्ध होण्यासाठी विविध विकासकामांच्या माध्यमातून कामे केली जातात.या उपलब्ध झालेल्या सुविधा व वास्तू यांचे संवर्धन करणे हे प्रत्येक नागरिकाचे प्रथम कर्तव्य आहे असे प्रतिपादन राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले

शुक्रवारी निफाड तालुक्यातील पिंपळगाव नजिक, चंद्र सुर्य मंदिर मरळगोई रोड व भरवज फाटा येथील विविध विकास कामांचे भूमीपूजन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी गटविकास अधिकारी महेश पाटील, विधानसभा अध्यक्ष वसंत पवार,कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर शेवाळे,भाऊसाहेब भवर,बाजार समितीचे संचालक पंढरीनाथ थोरे,ज्ञानेश्वर जगताप,डॉ.श्रीकांत आवारे, मंगेश गवळी,सीताराम आंधळे,सरपंच सचिन दरेकर, सरपंच काशिनाथ माळी,निवृत्ती जगताप,उपसरपंच लतिफ तांबोळी,माधव जगताप यांच्यासह अधिकारी व नागरिक उपस्थित होते. मंत्री छगन भुजबळ यावेळी म्हणाले, ६ कोटी ७० लक्ष निधीतून लासलगाव बसस्थानकाची पुनर्बांधणी लवकरच करण्यात येईल. सोळा गाव पाणी पुरवठा योजनेसाठी २१ कोटी रुपये निधी खर्च करून नूतनीकरण करण्यात आले आहे.


## जाहीर नोटीस

**धुळे येथील में दिवाणी न्यायाधिश सो। स्तर यांच्या न्यायालयांत**

**दि.कि.अर्ज १८८/२०२४**

१ ) सुरेश चिंधु परदेशी उ.व.-६४ धंदा, सेवानिवत्त-शिक्षक
रा.मु.पो.कुसुंबा ता.जि.धुळे
२) मिराबाई किशनलाल परदेशी (लग्नांनंतरचे नाव)
मिराबाई चिंधु परदेशी (लग्नांपुर्वीचे नाव) उ.व.-७०, धंदा-घरकाम
रा. ४९० एल. टाईप . मामे गांधीनगर नं ८ तहसिल भानपुरा तहसिल जि. भानपुरा. मंडिसोर मध्यप्रदेश
३) मंदाबाई चिंधु परदेशी उ.व.-५९, धंदा-सेवानिवत्त शिक्षीका
रा. मु.पो. कुसुंबा ता.जि. धुळे
४ ) रमेश चिंधु परदेशी उ.व.-५७, धंदा-नोकरी
रा. मु.पो.शिव अर्पाटमेंट रूमं नं १०१ काळा तलाव निदान हॉस्पीटल च्या समोर कल्याण पश्चीम कल्याण ता.जि.ठाणे. **....अर्जदार**

**॥ विरुध्द ॥** **... सामनेवाला**

कै. चिधुं तानाजी परदेशी मुत्यु दि.०९/०१/२०२३
कै. उखडाबाई चिंधु परदेशी मुत्यु दि. १९/०४/२००८
सर्व मयत मु.पो. कुसुंबा ता. जि. धुळे **....मयत**

ज्या अर्थी अर्जदार यांनी उपरोक्त विषयांन्वये कळविण्यात येते की. कै चिंधु तानाजी परदेशी मुत्यु दि.९/१/२०२३ अर्जदार यांनी शासकीय व निमशासकीय व अनुकंपातत्वावर नोकरीकरीता तसेच खाजगी कामासाठी आवश्यक असल्याने तसेच अर्जदार नं १ ते ४ यांनी कै. चिंधु तानाजी परदेशी मयत याचे कायदेशीर वारस ठरवुन मिळण्याकामी दि. २९/१/२०२४ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे न्यायालयात पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौकशी दि.०७/०३/२०२४ निश्चीत केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस व हितचिंतक व संबधितांना वारस वैगरे संबधितांना कळविण्यात येते की याबाबत काही वाद उपस्थि त राहुन हरकत नोंदवावी. हरकत असल्यास सदर दिनांकापासुन में दिवाणी न्यायाधिश स्तर यांच्या कार्टात नं ३ कोर्टाच्या कामकाजात सहभागी होवुन हरकत नोंदवावी. अन्यथा कोणाचीही हरकत नाही असे समजुन कामकाज पुर्ण करण्यात येईल नोंद घ्यावी. नंतर येणारी तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण. धुळे
दि. १/२/२४ आदेशावरुन

शिक्का

**कामगिरी कारकुन** **अधिक्षक**
**मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, धुळे मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, धुळे**


# केटीएचएम महाविद्यालयाला अर्थ डे ऑर्गनायझेशन, अमेरिकन संस्थेचा स्टार कॅम्पस अवॉर्ड

### शैक्षणिक, पर्यावरण, सामाजिक क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानाबद्दल सन्मान

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**




केटीएचएम महाविद्यालयाच्या मानांकनात अजून एक मानाचा तुरा रोवण्याचा दृष्टीने अर्थ दे ऑर्गनायझेशन, अमेरिका ह्या संस्थेमार्फत दिला जाणारा स्टार कॅम्पस २०२३ या अवॉर्डने महाविद्यालयाला गरविण्यात आले. अर्थ डे ऑर्गनायझेशन हि संस्था आंतराष्ट्रीय पातळीवर १९२ पेक्षा जास्त देशांमध्ये राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संघटनांसोबत तसेच शासकीय यंत्रणेसोबत आणि लाखो लोकांसोबत पर्यावरण संवर्धन, पर्यावरण जनजागृती, पर्यावरण शिक्षण, पृथ्वी वाचविण्यासंदर्भात अनेक उपक्रमांवर काम करत असते. महाविद्यालयाचे शैक्षणिक क्षेत्रातले योगदान आणि त्याच बरोबर महाविद्यालयाने विशेषत पर्यावरण आणि सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दाखल म्हणून महाविद्यालयाला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार वितरण समारंभ नुकताच के.टी. एच.एम. महाविद्यालयात पार पडला, सदर पुरस्कार वितरण समारंभासाठी अर्थ डे ऑर्गनायझेशन संस्थेच्या वतीने संस्थेचे भारतातील प्रतिनिधी श्री.विनायक साळोखे (असिस्टंट मॅनेजर, इंडिया ग्लोबल ऑफिस) हे महाविद्यालयात आले होते. सदर पारितोषिक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.डी.दरेकर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. सदर कार्यक्रमात श्री.विनायक साळोखे यांनी अर्थ डे. ऑर्गनायझेशन संस्थेच्या कार्याबद्दल माहिती सांगितली. महाविद्यालयास मिळालेल्या ह्या पुरस्काराबद्दल अभिनंदन केले. प्राचार्य डॉ.आर.डी.दरेकर यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणीक, पर्यावरणीय आणि सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल सविस्तर परिचय करून दिला. सदर पुरस्कार वितरण समारंभास महाविद्यालयाचे आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. एन.डी. गायकवाड, आय.क्यू.ए.सी. सचिव व पर्यावरण विभागप्रमुख डॉ. पी.एम.नलावडे, महाविद्यालयाचे सर्व उपप्राचार्य, सर्व विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते. प्रा.अश्रूती पवार यांनी समारंभाचे सूत्रसंचालन तर प्रा.के.डी.आहिरे यांनी समारंभाचे आयोजक म्हणून काम पाहिले. या पुरस्काराबद्दल मविप्र समाज संस्थेचे सरचिटणीस ड.नितीन ठाकरे यांच्या हस्ते प्राचार्य डॉ दरेकर यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वास मोरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर,उपसभापती देवराम मोगल, चिटणीस दिलीप दळवी तसेच सर्व संचालक मंडळ, शिक्षणाधिकारी डॉ.नितीन जाधव,डॉ अजित मोरे यांनी अभिनंदन केले आहे.


**धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर सो. यांचे कोर्टात**

**दि.कि.अ.नं. १११/२०२४**

१. सीताराम रामचंद्र पाटील
२. सतीश सीताराम पाटील
३. सारीका सीताराम पाटील
४. इच्छाराम सीताराम पाटील सर्व रा.धाडरे, ता.जि.धुळे **....अर्जदार**

**॥ विरुध्द ॥**
**कोणीही नाही** **....जाबदेणार**

## जाहीर नोटीस

ज्याअर्थी अर्जदार क्र. १ ते ४ यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर सो. यांचे कोर्टात दिनांक १६/१/२०२४ रोजी दि कि. अर्ज नं. १११/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. वरील अर्ज अर्जदार यांनी मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अन्वये मयत सिंधूबाई सीताराम पाटील रा. धाडरे ता. जि.धुळे येथे दिनांक ३०/०७/२०२४ रोजी निधन झाले. त्यांचे वारस घोषीत होउन मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. कोर्टाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करता पुढील चौकशीची ता. २/३/२०२४ रोजी निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस हितचिंतक वगैरे संबंधीतांना कळविण्यात येथे की, याबाबत काही वाद असल्यास येथील ७ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर सो. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन तक्रार करावी. त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही तक्रार उपस्थित झाली नाही, तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे. कोर्टाचे सहिशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.
स्थळ:- धुळे
दिनांक : २९/०१/२०२४ आदेशावरुन

शिक्का

**क. लिपीक** **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, धुळे** **दिवाणी न्यायालय, धुळे**

## न्यूज कॉलम

### वाहन अतिवेगाने चालविल्याने गुन्हा

धुळे । मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर अवधान गावाच्या शिवारात मोहाडी पोलिसांनी सापळा लावला. धुळ्याकडून मालेगावकडे जाणाऱ्या रोडवरून दोन ट्रक अति वेगाने जात असल्याचे आढळून आले.

### धुळे महापालिकेत दोन नवीन उपायुक्त

धुळे । येथील महापालिकेत नवीन दोन उपायुक्तांची नेमणूक झाली आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ च्या अनुषंगाने राज्य शासनाकडून सध्या अधिकाऱ्यांच्या बदल्यांची प्रक्रिया सुरू आहे. नगरविकास विभागानेही महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील मुख्याधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्या व पदस्थाना केल्या आहेत. यात चोपडा (जि. जळगाव) नगर परिषदेचे मुख्याधिकारी हेमंत निकम व पाचोरा (जि. जळगाव) नगर परिषदेच्या मुख्याधिकारी शोभा बाविस्कर यांची धुळे महापालिकेत उपायुक्तपदी पदस्थापना करण्यात आली.

### दोघांना मारहाण; चौघांवर गुन्हा दाखल

धुळे । धक्का लागला म्हणून काका-पुतण्यास मारहाण केल्याप्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल झाला. राजेश गुलाब बहिरम (रा. मोहगावपैकी वडपाडा, ता. साक्री) हा त्याच्या काकांसह ३१ जानेवारीला रात्री गावातील सोन्या चौधरी याला दिलेली दुचाकीचा तपास करण्यासाठी त्याच्या घरी गेला. परत येताना सोमा काळू पवार याला काकांचा धक्का लागला. त्याचा राग येऊन रौलेश काळू पवार याच्या जावायाने प्लास्टिकच्या पाईपने राजेश याला पायावर मारून जखमी केले.

# नेटबॉलमध्ये धुळे विभागाच्या पुरुष व महिला संघांना विजेतेपद

### उपविजेतेपद एरंडोल तर जळगाव व नंदुरबार तृतीय स्थानी

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त




कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव अंतर्गत पुरुष व महिला खेळाडूंच्या विभागीय नेटबॉल क्रीडा स्पर्धा धुळे तालुक्यातील नगाव येथील गंगामाई इंजिनिअरींग कॉलेजच्या मैदानावर नुकत्याच संपन्न झाल्या. स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे यांच्या हस्ते मैदानावर श्रीफळ फोडून करण्यात आले.

यावेळी प्राचार्य एस व्ही चोरडिया, प्राचार्य व्ही एम पाटील, एल एन गिरासे, नगेश पाटील, उपप्राचार्य गोविंद पोतदार, निवड समिती सदस्य प्रा. संजय भावसार ( एरंडोल), प्रा. राजेश सोनवणे (नंदुरबार), धुळे विभाग क्रीडा समिती सचिव प्रा.डॉ. नितीन वाळके, प्रा. नरेश बागल (धुळे), जिल्हा हौशी नेटबॉल असोसिएशनचे सचिव योगेश वाघ, राष्ट्रीय सुवर्णपदक विजेते खो-खो खेळाडू अविनाश वाघ, चारही संघांचे व्यवस्थापक प्रा.डॉ. अरविंद कांबळे, प्रा. हर्ष सरदार, प्रा. अमर हटकर, प्रा. एस. व्ही तागड, प्रा. शरतान चौधरी, हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. स्पर्धेत धुळ्याच्या पुरुष संघाने नंदुरबार (६१-००),एरंडोल ( २५-०७), जळगाव (४४-००), तर महिला संघाने नंदुरबार (१३-०० ),एरंडोल (२४-०३), जळगाव (४२-००) गुणांनी एकतर्फी हरवीत विजेतेपदाची परंपरा कायम राखली. विजेत्यासंघाचे प्रतिनिधित्व ऋत्विक ठाकूर, मयुरी जाधव यांनी केले स्पर्धेत एकुण आठ संघ सहभागी झाले होते. उपविजेपद एरंडोल तर तृतीय क्रमांकाचे विजेतेपद जळगाव व नंदुरबार विभागाने पटकवले. विद्यापीठाचे क्रीडा संचालक प्रा. डॉ. दिनेश पाटील यांनी विजेत्या संघांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. स्पर्धा यशस्वीतेसाठी स्पर्धा आयोजन समिती सदस्य प्रा.शरतान चौधरी सर यांच्या मार्गदर्शनाने महाविद्यालयाचे प्रा. दुर्गेश खैरनार, प्रा. बेडसे, प्रा. स्नेहा पवार, प्रा. पाटील, प्रा. तेजश्री बोरसे, श्री सारंग पाटील,प्रा. योगेश्र्वरी कोलापकर यांनी परिश्रम घेतले जिल्हा हौशी नेटबॉलचे निलेश चौधरी, हर्षल भदाणे, सोनिया गावडे, राजू साव, सनी जाधव, सचिन उचाळे व भविष्य वाघ यांनी पंच म्हणून काम सांभाळले. सुत्रसंचलन प्रा. जी एम इंदाईत यांनी केले.

# खा.डॉ.भामरेंच्या पाठपुराव्यामुळे भागणार निमडाळेकरांची तहान

### अक्कलपाडा प्रकल्पातून डाव्या कालव्याद्वारे तलाव भरण्यासाठी आवर्तन

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त



**निमडाळेकरांनी मानले खासदारांचे आभार**

**निमडाळे येथील पाणीटंचाईच्या मुद्द्यावर खासदार डॉ. सुभाष भामरे यांनी जिल्हाधिकाऱ्यांसह पाटबंधारे व जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांची चार वेळा बैठक घेत निमडाळे येथील शिपाई तलाव भरून घेण्यासाठी सतत पाठपुरावा केला. त्यांच्या या पाठपुराव्यामुळेच निमडाळे येथील ग्रामस्थांना उन्हाळ्यात पिण्यासाठी पाणी मिळणार असल्याने ग्रामस्थांनी तसेच ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी खासदार डॉ. भामरे यांचे आभार मानले आहेत.**

**जिल्हाधिकाऱ्यांचे आवर्तन सोडण्याचे निर्देश**

**या सूचनांनुसार पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी सर्वेक्षण करत येणाऱ्या अडचणी दूर केल्या. तसा अहवाल त्यांनी जिल्हाधिकारी व खासदार डॉ. भामरे यांना दिला. त्यानुसार जिल्हाधिकारी गोयल यांनी अक्कलपाडा प्रकल्पातून डाव्या कालव्याद्वारे निमडाळे येथील शिपाई तलाव भरण्यासाठी आवर्तन सोडण्याची निर्देश पाटबंधारे विभागाला दिले. त्यानुसार बुधवारी (ता. ३१) अक्कलपाडा प्रकल्पाच्या डाव्या कालव्यातून आवर्तन सोडण्यात आले असून, ते उद्या (ता. २) सायंकाळपर्यंत निमडाळे येथील शिपाई तलावात पोहोचण्याची शक्यता आहे. दरम्यान, भाजपचे उद्योग आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष उत्कर्ष रवंदळे-पाटील, भाजपचे तालुकाध्यक्ष देवेंद्र पाटील, पक्षाचे तालुका सरचिटणीस शरद पाटील, निमडाळेचे सरपंच सुधाकर सैंदाणे आदींनी बुधवारी कालव्यातून सोडलेल्या पाण्याची पाहणी केली.**

दर वर्षी उन्हाळ्यात पाणीटंचाईच्या झळा सहन करणाऱ्या निमडाळे (ता. धुळे) येथील ग्रामस्थांचा यंदाचा उन्हाळा मात्र दिलासादायक जाणार आहे. यासाठी खासदार डॉ. सुभाष भामरे यांचा सततचा पाठपुरावा महत्त्वाचा ठरला आहे. जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी अक्कलपाडा प्रकल्पाच्या डाव्या कालव्याद्वारे निमडाळे येथील तलाव भरण्यासाठी आवर्तन सोडण्याचे निर्देश दिल्यानंतर तशी कार्यवाही झाली असून, येत्या दोन दिवसांत हे पाणी निमडाळे येथील शिपाई तलावात पोहोचून निमडाळेकरांना पिण्यासाठी पाणी मिळणार आहे. यामुळे ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्र्वास सोडला आहे.

यंदा कमी पर्जन्यमानाच्या पार्श्र्वभूमीवर निमडाळे येथील ग्रामस्थांना गेल्या तीन महिन्यांपासून पाणीटंचाईचा सामना करावा लागत होता. तेथील ग्रामस्थांना चक्क २० ते २५ दिवसांनंतर पाणी मिळत होते. कमी पावसाअभावी दर वर्षीच निमडाळेकरांवर ही परिस्थिती ओढवत होती. याबाबत निमडाळेचे सरपंच सुधाकर सैंदाणे, उपसरपंच नितीन सूर्यवंशी, भाजपचे तालुका सरचिटणीस शरद पाटील आणि ग्रामस्थांनी खासदार डॉ. सुभाष भामरे यांच्याकडे पाणीटंचाईबाबत कैफियत मांडली. त्याची तीव्र दखल घेत खासदार डॉ. भामरे यांच्या सूचनेनुसार जिल्हाधिकाऱ्यांसह पाटबंधारे व जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांची चार वेळा बैठक झाली. गेल्या सहा जानेवारीला जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्यासह पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक झाली.



# भोरखेडा पटेल विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन साजरा

वरुळ । लक्ष महाराष्ट्र वृत्त

आर सी पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय भोरखेडा ता शिरपूर जि धुळे येथे वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन प्राचार्य आर एफ शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्ष धुळे जिल्हा परिषदेच्या सदस्य बेबीबाई फुटलाल पावरा या होत्या तर स्नेहसंमेलनाचे उद्धाटन पोलीस उपनिरीक्षक मोनिया निलेशसिंग राजपूत यांनी सरस्वती पूजन केले तर दीपप्रज्वलन प्रमुख पाहुणे शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारी अधिकारी डॉ उमेशजी शर्मा यांनी केले.

यावेळी भोरखेडा ग्रामपंचायत सरपंच विठाबाई शामराव ठाकरे,तोंदे ग्रामपंचायत सरपंच राहुल रुपसिंग चौधरी,असली ग्रामपंचायतचे उपसरपंच रुपाली सुनिल कोळी,माजी सरपंच उखडू गुलाब कोळी,प्राचार्य दिनेश राणा,मुख्याध्यापक पी एन गोसावी, ईश्र्वर पाटील,शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष रघुनाथ भिलेसिंग जमादार, सचिन राजपूत, नारायणसिंग राजपूत, सुरेंद्र राजपूत उपस्थित होते मान्यवरांचे स्वागत प्राचार्य आर एफ शिरसाठ, पर्यवेक्षक सी जी पाटील, मिना पटेल यांनी केले. प्रास्ताविक पर्यवेक्षक सी जी पाटील यांनी केले. स्नेहसंमेलनात २८१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यासाठी परीक्षक म्हणून सोनाली पाटील,सुमित जाधव,विकास राजपूत यांनी परीक्षण केले.प्रथम क्रमांक छत्रपती शिवराय शौर्य गाथा,द्वितीय क्रमांक मिलिटरी नृत्य, तृतीय क्रमांक केसरी के लाल या नृत्यांना मिळाला.

# देवरे अभियांत्रिकीत संस्थात्मक जाणीव या विषयावर परिसंवाद संपन्न: भटकर यांचे ऑनलाईन मार्गदर्शन

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त



श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजी राव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयात ईलेक्ट्रॉनिक्स विभागातर्फे प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांचे साठी संस्थात्मक जाणीव या विषयावर परिसंवाद नुकताच आयोजित करण्यात आला होता. पद्मश्री, पद्मभूषण व महाराष्ट्र भूषण परम संगणक निर्माते डॉ विजय भटकर यांनी या परिसंवादात ऑनलाईन मार्गदर्शन केले. तसेच जेष्ठ उद्योजक विचारवंत व महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी महेश लोहार यांनी परिसंवादात उपस्थित राहून बहुमोल मार्गदर्शन केले.

डॉ विजय भटकर यांनी या परिसंवादात ऑनलाईन मार्गदर्शन करताना स्वयं जागरुकता वृध्दींगत करणे, विचार व आकलन क्षमता विकसित करणे, नेतृत्व गुण वाढवणे, परस्परांमधील सहकार्य वाढवणे, नवनिर्मिती ला प्रोत्साहन देणे आदी विषयांवर महत्वपूर्ण मार्गदर्शन केले व भविष्यात लवकरच देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयात भेट देण्याबाबत आश्र्वस्त केले. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व योग प्रशिक्षक विचारवंत महेश लोहार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सकारात्मक विचार शैली अंगिकारुन व्यक्त होणे, जीवनात आनंदी रहाणे, कमतरतांवर मात करुन उद्दीष्टांवर लक्ष केंद्रित करणे, विषमतेतून समता व समतेतून विषमता, प्रज्ञा प्रबुद्ध विज्ञान, आयम आत्मा ब्रह्मा यावर मार्गदर्शन केले तसेच वेदना शक्ती, स्मृतीशक्ती, भावना शक्ती, मनिषा शक्ती, धारणा शक्ती, इच्छा शक्ती, संतोष शक्ती या मानवी मनाच्या विविध अवस्था व शक्ती यावर विस्तृत विवेचन केले. तसेच स्वतः च्या जीवनासाठी आदर्श रोडमॅप ठरवून त्यावर मार्गक्रमण करावे असे आवाहन केले. श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा आ बाबा साहेब कुणाल, महाविद्यालयाचे अध्यक्ष मा दादासाहेब सुभाष देवरे, उद्योजक विलास देवरे, प्राचार्य डॉ हितेंद्र पाटील यांच्या प्रमुख मार्गदर्शनात ईलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख प्रा विनोद शिंदे, प्रा डॉ सागर मोरे यांनी विभागातील सहकारी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांच्या सह संयोजन केले. विभागातील जेष्ठ प्राध्यापिका प्रा सौ संगीता राजपूत यांनी प्रास्ताविक, सूत्रसंचालन केले व प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्राचार्य डॉ हितेंद्र पाटील यांनी महेश लोहार यांचे स्वागत केले व सत्कार केला. या प्रसंगी विभाग प्रमुख प्रा डॉ एस डी सूर्यवंशी, प्रा डॉ पी एस पाटील, प्रा डॉ भालचंद्र मांडरे, प्रा डॉ ए आर मोरे, प्रा संगीता अग्रवाल तसेच प्रा डॉ पी एस देसले, विविध विभागातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते.

### दीड लाखाचा मुद्देमाल भाडणे शिवारात लंपास

धुळे । भाडणे (ता. साक्री) शिवारातील शेतातून चोरट्यांनी २५ क्विंटल कापसासह इलेक्ट्रिक मोटार, असा सुमारे दीड लाखाचा मुद्देमाल लंपास केला. संजय रामा थोरात (रा. अंबापूर, ता. साक्री) यांच्या तक्रारीनुसार त्यांच्या गावशिवारातील शेतामधील कांद्यांच्या चाळीतून चोरट्यांनी एक लाख २५ हजारांची २५ क्विंटल कपाशी व १५ हजारांची पाच वीजमोटार लंपास केली. चोरीची ही घटना ३१ जानेवारी ते १ फेब्रुवारीदरम्यान घडली.

# अपंग जनता दलाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी लक्ष्मण राठोड

होळनांथे । लक्ष महाराष्ट्र वृत्त




अपंग बांधवांच्या न्याय व हक्कासाठी लढणाऱ्या अपंग जनता दल या सामाजिक संघटनेच्या धुळे जिल्हा उपाध्यक्षपदी पिंपळे पुनर्वसन येथील लक्ष्मण छगन राठोड यांची निवड करण्यात आली असून त्यांच्या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

अपंगांवर होत असलेले अन्याय, अत्याचाराच्या विरोधात लढा देण्याकरीता अपंग जनता दल हया सामाजिक संघटनेचे राज्यभरात कार्य असून याच संघटनेचे ध्येय धोरणानुसार अपंगांना न्याय मिळवून देण्यासाठी लक्ष्मण राठोड यांची धुळे जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शेख अनिस यांच्या आदेशान्वये चाळीसगाव येथे झालेल्या संघटनेच्या मेळाव्यात, संघटनेचे राज्य उपाध्यक्ष लक्ष्मण वाघे यांनी लक्ष्मण राठोड यांची नियुक्ती केली आहे. यावेळी संघटनेचे राज्यअध्यक्ष बाळासाहेब लांडे, राज्यकार्याध्यक्ष जाकीरशेख, राज्यसंपर्कप्रमुख भाऊसाहेब दशपुते, धुळे जिल्हाध्यक्ष राजकुमार पाटील, जळगाव जिल्हा महिलाअध्यक्षा श्रीमती दिपाली पाटील, जळगाव जिल्हाअध्यक्ष देवेश पवार, जिल्हा महिलाउपाध्यक्षा माधुरी कवारे, महिला महासचिव सरला लुल्ले, जिल्हा सचिव निलेश पाटील, महासचिव बी. एस. ठाकूर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# छावा जनक्रांती संघटना महाराष्ट्रतर्फे जैन गुरुकुल वसतिगृहात खाऊ वाटप

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

छावा जनक्रांती संघटना महाराष्ट्रचे संस्थापक अध्यक्ष, समाजसेवक तथा उद्योजक शरद पवार यांचा हस्ते जैन गुरुकुल वसतिगृह येथे खाऊ वाटप करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाची सुरुवात पसायदानने करण्यात आली.

छावा जनक्रांती संघटना महाराष्ट्रतर्फे नाशिक येथे जैन गुरुकुल वसतिगृह येथे भेट देऊन विविध प्रकारच्या समस्यांची माहिती घेण्यात आली. छावा जनक्रांती संघटना महाराष्ट्रतर्फे सर्व प्रकारचे प्रश्र्न, समस्या सोडवण्यास मदत व सहकार्य केले जाईल, असे आश्र्वासन छावा जनक्रांती संघटना महाराष्ट्रतर्फे देण्यात आला. तसेच संघटनेतर्फे सर्व प्रकारची मदत व सहकार्य मोफत केले जात आहेत. सेवा ही मोफत केली जाते. पैसे घेऊन जी व्यक्ती, संस्था व संघटना काम करते, समाजसेवेसाठी पैसे घेतो तो दलाल असतो, असं छावा जनक्रांती संघटना महाराष्ट्रतर्फे सांगण्यात आले. प्रसंगी छावा जनक्रांती संघटना महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष शरद पवार यांनी सर्व अनाथ मुलांना आपल्या जीवनातील मनाचा ताबा, मनाची एकाग्रता, स्थिर मन, अस्थिर मन, चंचल मन, अंर्तमन, उत्साह, जिद्द, चिकाटी, धाडस, ध्येय व करियरवर सखोल आणि सविस्तर मुद्दे मांडत मार्गदर्शन केले.



# निरंकारी संत समागममध्ये दिव्य युगुलाच्या पावन सान्निध्यात पंचेचाळीस जोडपी विवाहबद्ध

सिडको । लक्ष महाराष्ट्र वृत्त

निरंकारी सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज व निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन सान्निध्यात आयोजित केलेल्या ५७ व्या वार्षिक निरंकारी संत समागमाच्या जागेवर एकंदर ४५ जोडपी विवाहबद्ध झाली. नव विवाहित वधूवरांना सदगुरु माताजींनी गृहस्थ जीवन भक्ति करत व्यतीत करण्यासाठी आशीर्वाद प्रदान केला. तसेच निरंकारी पद्धतीने साधे विवाह करण्याची निवड केल्याबद्दल त्यांच्या कुटुंबियांचे अभिनंदन केले.

या सामूहिक विवाह कार्यक्रमात वधूवरांनी पारंपारिक जयमाला (वरमाला) एकमेकांच्या गळ्यात घातल्या. याशिवाय निरंकारी विवाहाचे विशेष चिन्ह सामायिक हार निरंकारी मिशनच्या प्रतिनिधींनी प्रत्येक जोडप्याला परिधान केले. लांवांच्या (मंगलाष्टका) दरम्यान सद्गुरु माताजी व राजपिताजी यांनी वधूवरांवर पुष्पवर्षाव करुन आपला आशीर्वाद प्रदान केला. त्याचप्रमाणे वधूवरांच्या कुटुंबियांनीही त्यांच्यावर पुष्पवर्षाव केला. हे दृश्य खरोखरच अलौकिक होते. कालच्या या शुभ प्रसंगी महाराष्ट्रासह इतर राज्यांतून एकंदर ४५ जोडपी विवाहबद्ध झाली. त्यामध्ये मुंबई, अकोला, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा, चंद्रपुर, चिपळूण (रत्नागिरी), धुळे, डोंबिवली, गडचिरोली, जालना, कोल्हापुर, नागपुर, पालघर, पुणे सोलापुर, ठाणे, वर्धा आणि वाशिम या जिल्ह्यांसह मध्य प्रदेश, गुजरात, राजस्थान व उत्तर प्रदेश या राज्यांतील वधूवरांचा समावेश होता. नि:संदेह साध्या विवाहांचे हे अलौकिक दृश्य जाती, वर्ण इत्यादिंची विषमता दूर करुन एकत्वाचा सुंदर संदेश प्रस्तुत करत होते जो निरंकारी मिशनचा संदेश देखील आहे.

# आयमावर अखेर एकता पॅनलचाच झेंडा

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त



अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (आयमा) च्या निवडणुकीत एकता पॅनलच्या सर्व उमेदवारांनी मोठ्या फरकाने विजय मिळवल्याने औद्योगिक गोटात आनंदाचे वातावरण पसरले आहे. निमा आणि आयमावर आता एकाच विचारांचे पदाधिकारी निवडून आल्याने आता जिल्ह्यातील औद्योगिक विकासाला तसेच मोठ्या गुंतवणुकीचे प्रकल्प आणण्याला अधिक चालना मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

या निवडणुकीसाठी एकता पॅनलने आपल्या उमेदवारांची घोषणा केल्यानंतर विरोधकांचे अवसान गळाले आणि त्यांनी नांगी टाकून निवडणूक बिनविरोध करण्याचे आश्र्वासन दिले. त्यानुसार प्रयत्न सुरू असतानाच विरोधकांनी छुप्यारीतीने प्रयत्न करून अनिल आमले यांच्या रूपाने उमेदवार उभा करून निवडणूक लादलीच. त्यामुळे निवडणूकही खर्चिक झाली. आमले यांनी वेळीच माघार घेतली असती तर निवडणूक बिनविरोध होऊन निवडणुकीवर झालेला खर्चही वाचला असता असे अनेक उद्योजकांनी बोलून दाखवले.अध्यक्षपदासाठी ललित बूब, उपाध्यक्ष राजेंद्र पानसरे, सचिव प्रमोद वाघ, सहसचिव हर्षद बेळे व योगिता आहेर तर कोषाध्यक्षपदी गोविंद झा यांची आधीच बिनविरोध निवड झाली होती. तर कार्यकारी मंडळाच्या २५ जागांसाठी २६ उमेदवार रिंगणात असल्याने ३० जानेवारीला निवडणूक झाली. २१४६ पैकी सुमारे ४२ टक्के म्हणजे ८९८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. २६ मते बाद झाली. ३१ जानेवारीला तीन तासात मतमोजणी पूर्ण होऊन त्यात एकता पॅनलचे सर्व २५ उमेदवार निवडून आले. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून विवेक गोगटे यांनी काम बघितले. त्यांना सतीश कोठारी आणि एस.टी.गाजरे यांनी सहकार्य केले.विजयी उमेदवार पुढील प्रमाणे. कंसातील आकडे त्यांना पडलेली मते दर्शवितात जितेंद्र आहेर (८०१), जयदीप अलीमचंदानी (७९५), सुमित बजाज (७९१), अविनाश बोडके (७९९), श्र्वेता चांडक (८००), कुंदन डरंगे (७९७), विराज गडकरी (७९२), राहुल गांगुर्ड (७९२), हेमंत खोंड (७९७), उमेश कोठावदे (८०४), विनोद कुंभार (७९८), रवींद्र महादेवकर (८०४), अविनाश मराठे (८०२), जयंत पगार (७९६), श्रीलाल पांडे (७८०), जगदीश पाटील (७९७), करणसिंग पाटील (७९०), मनीष रावळ (८०५), रवी शामदासानी (८०१), धीरज वडनेरे (७९१), डी.बी.विभुते (७८९), अभिषेक व्यास (७८१), दिलीप वाघ (८०१), अजय यादव (७६८), रवींद्र झोपे ( ७७५).एकता पॅनलच्या सर्व उमेदवारांना निवडून आणण्यात निमाचे अध्यक्ष आणि या पॅनलचे नेते धनंजय बेळे, आयमाचे माजी अध्यक्ष विजय तलवार, जे.एम. पवार, मावळते अध्यक्ष निखिल पांचाळ, माजी अध्यक्ष ज्ञानेश्र्वर गोपाळे, वरूण तलवार आदींनी विशेष परिश्रम घेतले.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक





# धुळयात आयोजित एकांकिका स्पर्धेला तरूणाईने दिला जोरदार प्रतिसाद

## कलाकारांसह धुळेकर नागरिकांमध्ये निकालाची उत्सुकता





















धुळे

। धुळे शहरात अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने आयोजित शंभरावे नाट्य संमेलनाच्या निमित्ताने महाराष्ट्रभर नाट्यकलेचा जागर सुरु आहे. त्या अंतर्गत पत्रकार भवनात शनिवारी एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सकाळी स्पर्धेचे उदघाटन जेष्ठ कलावंत दिलीप दळवी, जेष्ठ कलावंत डॉ. अनिल बांदिवडेकर, जेष्ठ कलावंत विलास पगार, धुळे शाखेचे अध्यक्ष सुनिल नेरकर, मुंबई नियामक मंडळ सदस्य चंद्रशेखर पाटील, धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष रवींद्र इंगळे, धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सचिव सचिन बागुल, सुजय भालेराव यांच्या हस्ते करण्यात आले. ८ एकांकिकांना सादर करण्यात आले. तरूणाईने जोरदार प्रतिसाद दिला. परीक्षक जेष्ठ कलावंत डॉ. अनिल बांदिवडेकर यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले कि, प्रशांत दामले यांच्या संकल्पनेतून कला हि गावागावात जोपासली जावी म्हणून स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. जी एकांकिका परीक्षकांना थकवते ती प्रेक्षकांना आवडते ती उपांत्य फेरीत जाते. तुम्ही सर्व कलाकार एक दिलाने काम करा असे देखील सांगितले.

CMYK

दैनिक लक्ष महाराष्ट्र

धुळे-नंदुरबार-नाशिक






# नाट्यकलेचा जागर या संकल्पनेतून गावगावात कला जोपासण्याचा प्रयत्न

## जेष्ठ कलावंत डॉ. अनिल बांदिवडेकर यांचे प्रतिपादन




















धुळे। धुळे शहरात अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने आयोजित शंभरावे नाट्य संमेलनाच्या निमित्तानिमित्ताने महाराष्ट्रभर नाट्यकलेचा जागर सुरु आहे. त्या अंतर्गत पत्रकार भवनात शनिवारी एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत विविध विषयावर एकांकिका कलावंतांनी विविध विषयावर सादर केल्या. स्पर्धकांनी एकांकिकेचा विषय, विषयाचे गांभीर्य आणि लेखन कौशल्य तसेच दिग्दर्शकाचे सादरीकरणाबाबतचे स्पष्टीकरण दिग्दर्शक यावेळी मांडले. तसेच परीक्षकांनी देखील स्पर्धकांना मार्गदर्शन केले. स्वलिखित मुक्त विषयावर किंवा नावाजलेल्या लेखकांची संहिता घेऊन एकांकिका या स्पर्धेत दिसून आल्या. स्पर्धकांनी विविध विषयांना देखील हात घातल्याचे दिसून आले.